रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९ | अंक ८३ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

## अरुण गवळी अखेर तुरुंगाबाहेर!

**मुंबई :** कुख्यात डॉन अरुण गवळीला सर्वोच्च न्यायालयाने अखेर जामीन मंजूर केला आहे. शिवसेना नगरसेवक कमलाकर जामसंडेकर हत्या प्रकरणात हा जामीन मंजूर करण्यात आला आहे. तर, गवळीला सुनावण्यात आलेल्या जन्मठेपेच्या शिक्षेवर अपील अद्याप प्रलंबित आहे. वय आणि अपीलवरील प्रलंबित सुनावणीचा विचार करून गवळीला न्यायमूर्ती एम.एम. सुंदरेश आणि न्यायमूर्ती कोटेश्वर सिंग यांच्याकडून जामीन मंजूर करण्यात आला आहे. अरुण गवळीने जन्मठेपप्रकरणी आतापर्यंत १७ वर्षे कारागृहात शिक्षा भोगली आहे. त्याचे वय सध्या ७६ वर्षे असून, वयाचा विचार करुन त्याला जामीन मंजूर करण्यात आला आहे. शिवसेना नगरसेवक कमलाकर जामसंडेकर यांच्या हत्येप्रकरणी कुख्यात गुंड अरूण गवळीला २००७ मध्ये अटक करण्यात आली होती. या प्रकरणात अरूण गवळीला जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली आहे.


# कृषीवल

रायगड, शुक्रवार, दि. २९ ऑगस्ट २०२५

किंमत ५ ₹


## शक्तीपीठच्या भूसंपादनेतून कोल्हापूरला वगळलं

**मुंबई :** कोल्हापूरच्या शेतकऱ्यांना शक्तीपीठ महामार्ग भूसंपादनाच्या आदेशातून वगळण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला असून, तसा आदेश पारित केला आहे. शक्तिपीठ महामार्ग हा राज्यातील एकूण १२ जिल्ह्यांतील २९ तालुके आणि ३७० गावांतून जाणार आहे. हा प्रकल्प हाती घेण्यास, आखणीस आणि भूसंपादनासाठी शासनाने मान्यता दिली आहे. शक्तीपीठ महामार्गाच्या जमीन संपादनासाठी अधिग्रहणासाठी शासकीय आदेश जारी करण्यात आला आहे. त्यानुसार कोल्हापुरातील गावं वगळण्यात आली आहेत. त्यासंदर्भात पुन्हा चर्चा करुन निर्णय घेणार असल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. विदर्भातील वर्धा ते कोकणातील बांधापर्यंत एकूण ८०५ किलोमीटरचा शक्तिपीठ महामार्ग असणार आहे. राज्यातील वर्धा, यवतमाळ, हिंगोली, पान २ वर









## रायगड जिल्ह्यात गुटख्याच्या छुप्या विक्रीला
# पोलिसांचाच वरदहस्त?



■ पोलीस अधीक्षकांच्या भूमिकेकडे जनतेचे लक्ष

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यात गुटखा बंदी फक्त कागदावरच असल्याचे चित्र समोर आले आहे. जिल्ह्यात पान टपरीपासून किराणा दुकानात चढत्या दराने गुटखा विकला जात आहे. छुप्या पद्धतीने गुटखा विक्री होत असतानादेखील रायगड पोलिसांकडून बघ्याची भूमिका घेण्यात येत असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे या छुप्या गुटखा विक्रीला नक्की कोणाचा वरदहस्त आहे, असा सवाल जनमानसातून उमटत आहे. त्यामुळे रायगडच्या पोलीस अधीक्षक याबाबत काय भूमिका घेणार याकडे लक्ष लागून राहिले आहे.

जिल्ह्यामध्ये गुटखा, तंबाखू व अंमली पदार्थाची वाहतूक, विक्री व निर्मितीच्या धंद्यांचा सुळसुळाट होता. स्थानिक पोलिसांनादेखील अवैध धंदेवाले महत्त्व देत नव्हते. कारवाई करणाऱ्या पोलिसांवर कायमच दबाव राहिला होता.

> “अलिबाग हद्दीतील गुटखा, अंमली पदार्थ विक्री, वाहतुकीवर कारवाई करण्यात आली आहे. वेगवेगळ्या टपऱ्यांवर छापे टाकण्यात आले आहेत. छुप्या पद्धतीने गुटखा व अन्य धंदे चालत असतील, तर माहिती घेऊन त्यांच्याविरोधात कारवा केली जाईल.”
>
> – किशोर साळे, पोलीस निरीक्षक, अलिबाग

त्यामुळे अवैध धंदे जिल्ह्यात राजरोसपणे सुरु होते. पुण्यातील राज्य राखीव पोलीस दलाच्या समादेशक म्हणून काम पाहणाऱ्या आंचल दलाल यांची रायगडच्या पोलीस अधीक्षक म्हणून बदली करण्यात आली. मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात त्यांनी जिल्ह्याच्या सुरक्षेचा आणि कायदा सुव्यवस्थेचा पोलीस अधीक्षक म्हणून कारभार हाती घेतला. पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी जिल्ह्यातील मटका, जुगार, गुटखा, अंमली पदार्थ विक्री, वाहतूक, निर्मिती करणाऱ्यांना दणका देण्यास सुरुवात केली. अवैध धंदे चालविणाऱ्या माफियांसोबत आर्थिक हितसंबंध जपणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या, अशी चर्चा आहे.


गुटखा, मटका, जुगार क्लब चालविण्यावर पान २ वर

### अलिबाग बसस्थानक जुगाराचा अड्डा

अलिबाग पोलीस ठाण्यापासून हाकेच्या अंतरावर अलिबाग एसटी बसस्थानक आहे. या स्थानकात भरदिवसा मटका जुगार चालविला जात आहे. स्थानकात वेगवेगळ्या ठिकाणी छुप्या पद्धतीने बसून चिठ्ठी दाखवून मटका जुगार खेळला जात आहे. त्यामुळे प्रवासी कमी आणि मटका जुगार चालविणारे जास्त, अशी परिस्थिती अलिबाग स्थानकात निर्माण झाली आहे. अलिबाग स्थानक मटक जुगाराचा अड्डा बनत चालला असल्याचे बोलले जात आहे. तसेच शहरातील कचराभूमीच्या परिसरातदेखील दुपारच्या वेळेला मटका जुगार चालविला जात असल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे अलिबाग पोलीस करतात काय, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

(नागोठण्यात चिठ्ठी बंद, मोबाईल मटका सुरुच : पान २ वर)

## दीड दिवसांच्या बाप्पाला निरोप
### जिल्ह्यात २५ हजार ५५१ गणेशमूर्तींचे विसर्जन



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

‘गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया, पुढच्या वर्षी लवकर या’ अशा जयघोषात, साश्रुनयनांनी रायगड जिल्ह्यातील गणेशभक्तांनी दीड दिवसांच्या बाप्पाला निरोप दिला. जवळपास २५ हजारांहून अधिक दीड दिवसांच्या बाप्पाला जड अंतःकरणाने निरोप देण्यात आला. तलाव, समुद्रकिनारे, नद्यांमध्ये विसर्जन सोहळा पार पडला.



बुधवारी (दि.२७) वाजत-गाजत, ढोल-ताशांच्या गजरात, टाळ-मृदुंगाच्या निनादात लाडक्या बाप्पाचे घरोघरी आगमन झाले हाते. जिल्ह्यात एक लाख दोन हजार ४८४ गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना करण्यात आली. गुरुवारी (दि. २८) दीड पान २ वर

### कृत्रिम तलावाला पसंती

गणेशमूर्ती विसर्जन करण्यासाठी अलिबाग नगरपरिषदेमार्फत समुद्रकिनारी कृत्रिम तलावाची निर्मिती करण्यात आली होती. दीड दिवसांच्या ७० हून अधिक गणेशमूर्तींचे विसर्जन कृत्रिम तलावात करण्यात आले. भाविकांनी कृत्रिम तलावात मूर्तींचे विसर्जन करण्याला अधिक पसंती दिली. तसेच स्वच्छता राखण्यासाठी निर्माल्य संकलन कलश किनारी ठेवण्यात आले होते. भाविकांनी फुले व इतर निर्माल्य कलशामध्ये टाकण्यावर भर दिला.

## महावितरणचा गलथानपणा उघड
### विजेच्या धक्क्याने म्हशीचा मृत्यू

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील बोरिवली येथील जंगलात चरण्यासाठी गेलेल्या दोन म्हशींना विजेच्या तारांचा धक्का लागला. त्या विजेच्या धक्क्यात एका म्हशीचा मृत्यू झाला आहे. दुभती म्हैस दगावल्याने शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, त्याच्यासमोर कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न उद्भवला आहे.

बोरिवली येथे विजेची वाहिनी खाली लोंबकळत होती. सकाळच्या वेळी चरण्यासाठी जंगल भागात जात असलेल्या म्हशींना प्रवाहित विद्युत वाहिनीचा धक्का बसला. त्या धक्क्यात त्यातील अनेक म्हशींपैकी दोन म्हशी तडफडू लागल्या. मात्र, त्यातील एका म्हशीचा जागीच मृत्यू झाला. या घटनेत मृत झालेली म्हैस ही दुभती असल्याने तिच्या मृत्यूमुळे शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. महावितरणकडून शेतकऱ्याला नुकसान भरपाई मिळावी यासाठी प्रस्ताव करून वरिष्ठ कार्यालयाला पाठविण्यात आला आहे.

## विरार इमारत दुर्घटनेत १७ बळी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

विरार दुर्घटनेत आतापर्यंत इमारतीच्या ढिगाऱ्याखालून २४ जणांना बाहेर काढण्यात आले आहे. त्यात १७ जणांचा मृत्यू झाला आहे. अजूनही मागील ४८ तासांपासून राष्ट्रीय आपत्ती निवारण पथक व पालिकेच्या अग्निशमन दलाकडून बचावकार्य सुरू आहे. मंगळवारी रात्री विरार पूर्वेच्या विजयनगर परिसरातील रमाबाई अपार्टमेंट या इमारतीचा काही भाग कोसळल्याची घटना घडली.



या दुर्घटनेबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तीव्र दुःख व्यक्त केले आहे आणि मृतांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे. मृतांच्या वारसांना राज्य सरकारकडून पाच लाखांची मदत त्यांनी जाहीर केली. ४८ तासांपासून एनडीआरएफच्या मदतीने बचावकार्य सुरू आहे.

## अलिबागच्या शिरपेचात मानाचा तुरा

■ डॉ. श्याम ढवण यांचा राष्ट्रपती मुर्मूंच्या हस्ते गौरव

■ रायगडसह अलिबाग, सासवणे गावाच्या नावलौकिकात भर

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

सामाजिक आणि औद्योगिक योगदानाबद्दल डॉ. श्याम ढवण यांना राष्ट्रपती दौपद्री मुर्मू यांच्या हस्ते गौरविण्यात आले. अलिबाग तालुक्यातील सासवणे येथील मूळ रहिवासी असणारे ढवण यांच्यामुळे अलिबागच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, रायगड जिल्ह्यासह अलिबाग तालुका आणि सासवणे गावाचा नावलौकिक निचितच वाढला आहे.



पशुवैद्यकीय पदवीधर असलेल्या डॉ. ढवण यांनी शासकीय नोकरी सोडून ग्रामीण भागातील रोजगाराला चालना दिली. त्यांनी प्रीमियर फीड चिक्स या नावाने कुक्कुट खाद्यनिर्मितीचा उद्योग सुरू करून हजारो तरुणांना रोजगार उपलब्ध करून दिला. पान २ वर

## बाप्पांच्या विसर्जनासाठी आर्थिक भुर्दंड

■ ग्रामस्थांचा संताप; प्रशासनाचे दुर्लक्ष

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**



रेवदंडा येथे दीड दिवसांच्या बाप्पांना भावपूर्ण निरोप देण्यात आला. परंतु, रेवदंडा समुद्रकिनारी आलेल्या चिखलामुळे भक्तांचे हाल झाले. दरम्यान, स्थानिक ग्रामपंचायतप्रशासनाच्यादुर्लक्षामुळे किनाऱ्यावर बाप्पांचे विसर्जन करण्यात अडचण निर्माण झाली. त्याचा नाहक त्रास स्थानिकांना सोसावा लागल्याचा आरोप आहे. किनाऱ्यापर्यंत बाप्पांना घेऊन जाणे शक्य नसल्याचा फायदा घेत काही स्थानिक कोळी बांधवांनी विजर्सनासाठी पैसे घेतल्याने संताप व्यक्त होत आहे.

दरवर्षी रेवदंडा समुद्रकिनारी मोठ्या उत्साहात पान २ वर



# नागोण्यात चिठ्ठी बंद, मोबाइल मटका सुरूच

- पोलीस अधीक्षकांच्या डोळ्यात धूळ फेकण्याचा प्रकार
- नागोठण्यातील चोरी छुपे व्यवसायाला आशीर्वाद कुणाचा?

| अलिबाग | प्रतिनिधी |

रायगडच्या पोलीस अधीक्षक आँचल दलाल यांनी आपल्या पदाची सूत्रे हातात घेतल्याबरोबरच सर्व अवैध धंद्यांना चाप लावण्याची मोहीम हाती घेतली होती. यामध्ये अवैध मटका, जुगार, ऑनलाइन गेम, चक्री जुगार यांसह अनेक अवैध धंद्यांना त्यांनी जिल्ह्यात बंदी आणली आहे. तर, जिल्ह्यातील अवैध मटका व्यवसाय तर हद्दपार करण्याचे मनावर घेतले आहे. लेडी सिंघम म्हणून आँचल दलाल यांनी केलेल्या कारवाईचे नागरिकांतून स्वागत करण्यात येत असतानाच जिल्ह्यात मटक्याच्या टपऱ्या बंद झाल्या असल्या तरी अजूनही काही ठिकाणी चोरी छुपे मोबाईलवर घेतला जाणारा मटका मात्र सुरूच आहे.

यामध्ये जिल्ह्यातील मध्यवर्ती ठिकाण असलेल्या नागोठणे शहराचाही समावेश असून, येथील या चोरी छुपे मोबाईल मटका व्यवसायाला नक्की कुणाचा आशीर्वाद आहे, याची चर्चा होत आहे. त्यामुळे आँचल



दलाल यांच्या डोळ्यात नक्की कोण धूळफेक करीत आहे, हा प्रश्न उपस्थित होत आहे. त्यामुळे आँचल दलाल आता याप्रकरणी नक्की कोणती भूमिका घेतात व काय कारवाई करतात, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

मटका खुलेआम सुरू असताना चिठ्ठीवर घेतला जात होता. आता पद्धत तीच आहे, पण चिठ्ठीऐवजी फक्त मोबाइलवरून मटक्याचा बिझनेस सांगितला जातो. दुसऱ्या दिवशी मटका कंपनीची व्यक्ती फोनवरू अज्ञात ठिकाणी मटका घेणाऱ्याला बोलावते आणि आदल्या दिवशीच्या बिझनेसचे पैसे घेऊन जाते.

मुंबई-कल्याणचा ओपन-क्लोजचा आकडा घेतल्यानंतर ठरलेल्या वेळेच्या आत सर्व आकड्यांचा हिशेब द्यावा लागतो. पूर्वी एक व्यक्ती दुचाकीवरून येऊन सर्व चिठ्ठ्या घेऊन जात असे. त्यानंतर आकडे जाहीर व्हायचे. आता मटका घेणारे आपापल या ओळखीच्या लोकांचेच मटका घेत आहेत. पैशाची घेवाण-देवाण मात्र लपूनछपून सुरू आहे. मोबाइलचा नवीन नंबर किंवा नवीन चेहरा दिसला की मटका बंद असल्याचे सांगितले जाते. पूर्वी मटका खुलेआम टपऱ्यांमध्ये घेतला जात होता. आज ते प्रमाण कमी झाले आहे. सध्या कुणाच्या तरी घरातून, हॉटेल, चहाची टपरी, कोल्ड्रिंक्सची दुकाने, रिक्षांमध्ये, चालता फिरता तो सुरू आहे. शहराच्या कानाकोपऱ्यात मटका मोबाइलवरून घेतला जात आहे.

पूर्वी मटका टपरीबद्दल वर्तमानपत्रात फोटोसहित बातमी प्रसिद्ध केले की, केवळ संबंधित टपरीवरच किरकोळ कारवाई व्हायची. पुन्हा आठवड्याभराने जैसे थे स्थिती असायची. मात्र, त्यावेळी इतर टपऱ्यांना धक्का लागत नव्हता. पोलीस अधीक्षक आँचल दलाल यांनी सुरुवातीलाच जिल्ह्यातील सर्व अधिकाऱ्यांची बैठक घेऊन रायगड जिल्ह्यात अवैध धंदे चालणार नाही, हे खडसावून सांगितले. तेव्हापासून मटका, जुगार क्लब आणि हातभट्टी विक्री बंद झाली. नंतर ही हातभट्टी दारू विक्री पुन्हा सुरू झाली. चिठ्ठीद्वारे चालणारा मटका बंद झाला, पण मोबाइल मटका सुरू झाला, अशी भयानक परिस्थिती सध्या निर्माण झाली आहे.

## ज्ञानेश्वरी, शिवलीलामृत ग्रंथाचे पारायण

| भाकरवड | प्रतिनिधी |

अलिबाग तालुक्यातील अखंड वारकरी संप्रदाय यांच्या संयुक्त विद्यमाने २५ जुलै रोजी वैकुंठ वाशी नारायणबाबा गडबकर, केशव स्वामी, नारायण बाबा नीलकर, रायगड भूषण विद्याधर महाराज देहेन यांच्या प्रेरणेने सुरू झालेल्या या ज्ञानेश्वरी व शिवलीलामृत पारायण २३ ऑगस्ट रोजी सांगता समाप्ती हनुमान मंदिर धेंरड येथे जगन्नाथ महाराज यांच्या कीर्तन सेवेतून संपन्न झाला. दरम्यान, गंगाधर महाराज, शिवशाहीर अमित महाराज बळवली, शेळके महाराज, सावळाराम महाराज, अमरनाथ महाराज, राम शिंगासने, गोरखनाथ पाटील, अमित महाराज, म.के. पाटील गुरुजी, महादेव महाराज अलिबाग, अशोक भोपी यांच्या परिश्रमातून कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या सर्वांनी देवाची आनंदी येथे जाऊन संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या ७५० व्या जन्म वर्षानिमित्त २१ ऑगस्ट रोजी निजानंद बाबा चेतनआश्रम या ठिकाणी एकदिवसीय नाम सप्ताह पारायण नामस्मरण करण्यात आले.

# लालपरी खासगी प्रवाशी वाहनांच्या विळख्यात




| म्हसळा | प्रतिनिधी |

म्हसळा शहरातील बहुजनांच्या वाहतुकीवर प्रशासन नाराज असताना आता बहुजनांच्या सोयीसाठी असणाऱ्या एसटी बसथांब्यावरसुद्धा खासगी प्रवासी वाहने आणि फेरीवाल्यांनी विळखा घातला आसल्याची तक्रार श्रीवर्धन डेपो मॅनेजर म.अ. मणेर यानी म्हसळा तालुक्याचे तहसीलदार सचिन खाडे, नगर पंचायतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी विठ्ठलराव राठोड, स.पो.नि. संदीप कहाळे यांच्याकडे केली आहे.

पादचाऱ्याना शहरांतून चालण्यासाठी आणि फूटपाथवरील खरेदी सहज, विनासायास करता यावी यासाठी नगरपंचायत, महसूल, पोलीस प्रशासनाने यावेळी विशेष काळजी घेऊन म्हसळा बाजारपेठेमधून एसटी वाहतूक न होण्यासाठी विशेष काळजी घेतली आहे. शहरातील संपूर्ण वाहतूक ग्राहकांच्या सोयीसाठी शहराच्या बाहेरून वळविल्यामुळे प्रवाशांना बसथांब्यावर येण्यासाठी रोज किमान ११ ते १५ रुपयांचा भुर्दंड मोजून वेळेचासुद्धा अपव्यय होतो.

# जिल्हाधिकारी कार्यालयात सेवाकर्मी कार्यक्रमांतर्गत १०० टक्के कामकाज पूर्ण

| अलिबाग | प्रतिनिधी |

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आस्थापनेवर एकूण १ हजार ३९० अधिकारी व कर्मचारी कार्यरत असून, सेवाकर्मी कार्यक्रमांतर्गत आस्थापनाविषयक विविध उपक्रम राबविण्यात आले आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयातील वर्ग ३ व वर्ग ४ संवर्गातील सर्व कर्मचाऱ्यांची बिंदुनामावली तयार करून कोकणभवन येथून तपासून घेण्यात आली असून, आवश्यक दुरुस्त्या करून ती प्रमाणित करण्यात आली आहे. तसेच दोन्ही संवर्गातील अंतिम ज्येष्ठता यादीदेखील प्रसिद्ध करण्यात आली आहे. १ हजार ३७१ अधिकारी-कर्मचाऱ्यांपैकी पोर्टलवर १ हजार ३१९ जणांचे रजिस्ट्रेशन पूर्ण झाले असून, त्यापैकी ४८४ कर्मचाऱ्यांनी ५ कोर्सेस पूर्ण केले आहेत. १ ऑगस्ट २०२४ ते ३१ जुलै २०२५ या कालावधीत १७८ अधिकारी-कर्मचाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यात आला असून, ६१ जणांना स्थायित्व प्रमाणपत्र देण्यात आले आहे. त्याच कालावधीत ११ कर्मचाऱ्यांना शिपाई संवर्गातून महसूल सहायक संवर्गात तर आणखी ११ कर्मचाऱ्यांना ग्राम महसूल अधिकारी संवर्गातून मंडळ अधिकारी संवर्गात पदोन्नती देण्यात आली आहे.

मागील वर्षी राज्य शासनाच्या नियुक्त्यांतर्गत जिल्ह्यात २१६ उमेदवारांना ग्राम महसूल अधिकारी, १८ उमेदवारांना महसूल सहायक तसेच पुरवठा विभागात ४१ उमेदवारांना महसूल सहायक म्हणून नियुक्ती देण्यात आली आहे. गट क व ड संवर्गातील २५ मृत शासकीय कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा नियुक्ती देण्यात आली असून प्रतिक्षा यादीतील बहुतांश उमेदवारांना संधी देण्यात आली आहे. याशिवाय जिल्ह्यातील कोतवाल व पोलीस पाटील संवर्गातील रिक्त पदांच्या भरतीची प्रक्रिया सुरू असून, जिल्हाधिकारी कार्यालयातील बहुतांश कर्मचाऱ्यांचे सेवा अभिलेख डिजिटल करण्यात आले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलेल्या १५० दिवसांच्या कार्यक्रमात अंतर्भूत असलेल्या आस्थापनाविषयक सर्व बाबींचे १०० टक्के कामकाज रायगड जिल्हाधिकारी कार्यालयाने पूर्ण केल्याचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी सांगितले.

# विसर्जन मिरवणुकीत लेझर लाईट वापरास बंदी

- जिल्हाधिकाऱ्यांकडून आदेश जारी

| अलिबाग | प्रतिनिधी |

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान लेझर लाईटमुळे नागरिक तसेच बंदोबस्तासाठी नियुक्त अधिकारी-कर्मचारी यांच्या आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामांचा विचार करता, जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दि. २ सप्टेंबर २०२५ (५ दिवसांचे विसर्जन) आणि दि. ०६ सप्टेंबर (११ दिवस-अनंत चतुर्दशी) रोजी होणाऱ्या विसर्जन मिरवणुकीदरम्यान लेझर लाईटचा वापर करण्यास कडक बंदी घालण्याचे आदेश दिले आहेत.

अनेकदा मिरवणुकीतील ध्वनीक्षेपकांचा दणदणाट, डॉल्बी साऊंड सिस्टम, स्नो स्प्रे, हिट स्प्रे आणि लेझर बीम लाईट्समुळे नागरिकांना बहिरेपणा, हृदयविकाराचे झटके तसेच डोळ्यांचे आजार उद्‌भवले असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आणि आरोग्याच्या दृष्टीकोनातून ही कारवाई करण्यात आली आहे.

या आदेशाचा भंग करून विसर्जन मिरवणुकीत लेझर लाईट वापर करणाऱ्या व्यक्ती/संस्था/मंडळ/संचालक यांच्याविरोधात दंडात्मक कारवाई केली जाईल, असा इशारा जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिला आहे.

# उलवेत दुर्मिळ ४२ मुनिया पक्षी जप्त



- तस्करांना कोठडी

| उरण | प्रतिनिधी |

उरण वनविभागाने उलवे नोड परिसरात मोठी धाड टाकत दुर्मिळ पक्ष्यांच्या तस्करीचा पर्दाफाश केला. रेड मुनिया, स्कॅली मुनिया आणि ट्रायकलर मुनिया या मौल्यवान प्रजातींचे तब्बल ४२ पक्षी जप्त करण्यात आले. याप्रकरणी देवेंद्र लालचंद पाटील (रा. कोपरखैरणे) आणि हरेश दामोदर पाटील (रा. पेण) या दोन तस्करांना अटक करून पनवेल न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने दोघांनाही दोन दिवसांची कोठडी सुनावली.

गोपनीय माहितीच्या आधारे उरणचे वनपरीक्षेत्र अधिकारी नथुराम कोकरे, वनपाल संजय पाटील (दापोली), नारायण माने (जासई), तसेच वनरक्षक पांडुळे, खताळे, झेंडे, कार्ले, पाटील आणि रेंज स्टाफ यांच्या संयुक्त पथकाने ही धाड घातली. रात्री सुमारे नऊ वाजता आरोपी हे पक्षी विक्रीसाठी पिंजऱ्यात घेऊन आले असताना सापळा रचून कारवाई करण्यात आली.

जप्त केलेले सर्व पक्षी वनविभागाने नंतर जंगलात सोडले. आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वनविभागाचे हे पथक कार्यवाहीसाठी कौतुकास पात्र ठरले असले, तरी उलवे व आसपासच्या भागात दुर्मिळ पक्ष्यांची अशी उघड तस्करी नेमकी कोणाच्या आश्रयामुळे फोफावत आहे? हा प्रश्न अनुत्तरितच आहे. प्रशासनाच्या नजरेआड होऊन पर्यावरणाशी खेळ करणारे हे माफिया आता उघड झाले आहेत.

वन्यजीवांची लूट थांबवा, अन्यथा मोठं जनआंदोलन उभारलं जाईल, असा इशारा स्थानिक पर्यावरणप्रेमींनी दिला आहे.

# टीओडी मीटरमध्ये छेडछाड;दोन घटना उघडकीस

| कल्याण | प्रतिनिधी |

महावितरणकडून राज्यात जुने मीटर काढून नवीन टीओडी मीटर (टाईम ऑफ डे) लावण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. या मीटरमध्ये छेडछाड करण्याच्या दोन घटना कल्याण परिमंडळातील बदलापूर आणि वसई येथे उघडकीस आल्या आहे.




कल्याण परिमंडळात देखील मोठ्या प्रमाणात वीज ग्राहकांचे जुने मीटर बदलून नवीन टीओडी मीटर लावले आहेत. वीज देयक कमी यावे यासाठी काही ग्राहक मीटरमध्ये छेडछाड करीत असतात. पण, प्रत्यक्षात सकाळी ९ ते संध्याकाळी ५ या वेळेत वीज वापर करणाऱ्या ग्राहकांना ८० पैसे प्रतियुनिट सूट मिळते आहे. महावितरणकडून लावण्यात येणाऱ्या टीओडी मीटरमध्ये छेडछाड करणे अवघड झाले आहे. नवीन टीओडी मीटरमध्ये कम्युनिकेशन पोर्ट लावले असल्याने ग्राहकाच्या क्षणाक्षणाच्या वीज वापराची माहिती महावितरण यंत्रणेला मिळत असते. जर ग्राहकांने यात छेडछाड केली तर त्या ठिकाणी जाऊन मीटरची तपासणी करून खात्री करण्यात येते.या टीओडी मीटरमध्ये छेडछाड केली तर वीज बिल कमी होण्या ऐवजी ते वाढले आहे.महावितरणच्या बदलापूर आणि वसई उपविभागातील गुणवत्ता नियंत्रण विभागाने अशा संशयित ग्राहकांच्या वीज वापरावर लक्ष ठेवले होते. प्रत्यक्ष ग्राहकाचे मीटर लावले त्या ठिकाणी जाऊन तपासणी केली असता यात छेडछाड केल्याचे आढळून आले. अशा ग्राहकांच्या विरोधात पोलीस तक्रार करण्याची कारवाई महावितरण कडून देण्यात सुरू झाली आहे.वीज मीटर मध्ये छेडछाड करणे हा दंडनीय अपराध आहे. वीज चोरी करणाऱ्यास कठोर कारावास किंवा आर्थिक दंडाची तरतूद वीज कायद्यात करण्यात आली आहे.

जर महावितरणच्या टीओडी मीटरमध्ये छेडछाड करीत असल्याचे आढळून आल्यास जवळच्या महावितरण कार्यालयात संपर्क साधावा, असे आवाहन मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा यांनी केले आहे.

पान १ वरुन

## दीड दिवसांच्या बाप्पाला निरोप

दिवसाच्या बाप्पाला जड अंतःकरणाने निरोप देण्यात आला. तलाव, समुद्र, नद्यांमध्ये २५ हजार ५५१ गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात आले. 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या' असा जयघोष करीत टाळ-मृदुंगासह बेंजोच्या तालावर नाचत विसर्जन ठिकाणापर्यंत मिरवणूक काढण्यात आली. बाप्पा आल्यावर जितका आनंद सर्वांच्या चेहऱ्यावर होता, तितकेच दीड दिवसांच्या बाप्पाला निरोप देतानाचे दुःखही चेहऱ्यावर दिसत होते. बाप्पाच्या विसर्जनावेळी

कोणतीही अनुचित घटना घडू नये, म्हणून सतर्कतेच्या दृष्टीने रायगड पोलिसांकडून सुरक्षेच्या बाबतीत खबरदारी घेण्यात आली होती. दरम्यान, अलिबाग नगरपरिषदेच्यावतीने समुद्रकिनारी साफसफाई करण्यात येऊन विसर्जनास येणाऱ्या भाविकांच्या मदतीसाठी मदत केंद्र उभारण्यात आले होते.

दीड दिवस मनोभावे सेवा केल्यानंतर बाप्पाला निरोप देण्याची तयारी गुरुवारी दुपारपासून सुरु झाली. नदी व तलावांमध्ये गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात आले. यावेळी कोणताही अनुसूचित प्रकार घडू नये यासाठी गावांतील तरुणांनी स्वयंसेवक म्हणून भूमिका बजावली. अलिबागसह काशीद, वरसोली, मुरूड, रेवदंडा, नागाव, थेरोंडो, किहाम, नागाव, श्रीवर्धन आदी समुद्र किनाऱ्यांवर गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात आले. जिल्ह्यामध्ये एकूण २५ हजार ५५१ गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात आले. त्यात सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या १२ व घरगुती २५ हजार ५३९ गणेशमूर्तींचा समावेश होता.

**मदत केंद्रासह आरती स्थळाची उभारणी**

अलिबाग नगरपरिषदेमार्फत समुद्रकिनारी मदत केंद्र व आरती स्थळाची उभारणी करण्यात आली आहे. दीड दिवसांच्या गणेशम ूर्तींचे विसर्जन करण्यासाठी समुद्रकिनारी आलेल्या भाविकांच्या सुरक्षेसाठी मदत केंद्र सुरु करण्यात आले होते.किनारी गर्दी होऊ नये म्हणून आरती स्थळही उभे केले होते.

**सुरक्षेसाठी बॉम्बशोधक पथकामार्फत तपासणी**

अलिबाग व समुद्रकिनारी गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यासाठी भाविकांची अलोट गर्दी होते. या गर्दीमध्ये काही अनुचित प्रकार घडू नये, म्हणून रायगड पोलिसांमार्फत सकाळी दोन्ही समुद्रकिनारी बॉम्बशोधक पथकामार्फत तपासणी करण्यात आली. तसेच श्वान पथकामार्फतदेखील किनारी सर्व परिसराची तपासणी केली.

## विसर्जनासाठी आर्थिक भुर्दंड

गणेश विसर्जन पार पडते. मात्र, यंदा ओहोटीमुळे समुद्राचे पाणी मागे सरकल्याने संपूर्ण किनाऱ्यावर चिखल साचला आहे. हा चिखल दलदलीसारखा झाल्याने पाय आत खोलवर जात होते आणि अडकण्याचा धोका निर्माण झाला. परिणामी, भक्तांना नेहमीप्रमाणे थेट समुद्रात उतरून विसर्जन करणे शक्य झाले नाही. परंतु, स्थानिक ग्रामपंचायत प्रशासनाने ठोस उपाययोजना न केल्याने झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. याबाबत ग्रामपंचायतीचे सरपंच श्री. मोरे यांच्याशी संपर्क साधून अधिक माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला; परंतु तो होऊ शकला नाही.

समुद्रकिनाऱ्यावर साचलेला चिखल जेसीबीच्या सहाय्याने काढून विसर्जनासाठी रस्ता तयार करण्यात आला. परंतु, चिखल जास्त प्रमाणात असल्याने किनाऱ्यापर्यंत पोहोचणे शक्य झाले नाही. दरम्यान, याठिकाणी काही स्थानिक कोळी बांधवांनी विसर्जनासाठी होड्या सज्ज ठेवल्या होत्या. परंतु, होडीतून बाप्पांना नेण्यासाठी पैसे आकारले जात होते. एका होडीत एकावेळी पाच ते सहा गणपती नेऊन समुद्रात विसर्जित करण्यात आले. एका गणेशमूर्तीसाठी २०० रुपये आकारल्याची चर्चा आहे. परंतु, ग्रामपंचायतीने वेळीच लक्ष देऊन उपाययोजना केली असती, तर नाहक आर्थिक भुर्दंड सोसावा लागला नसता, असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. दरम्यान, रेवदंडा मुख्य समुद्रकिनाऱ्याला चिखलाचे स्वरूप आले असल्याने रेवदंडा पुलाजवळील खाडीत पाणी जास्त असल्याने तेथे बाप्पांचे विसर्जन करण्यात आले.

## पोलिसांचाच वरदहस्त?

जुगार क्लब चालविण्यावर बंदी घातली. स्थानिक पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकाऱ्यांना सूचना देत कारवाई करण्याचे आदेश दिले. त्यांच्या आदेशानुसार जिल्ह्यात कारवाई करण्यात आली. अंमली पदार्थांची तस्करी करण्यापासून मटका, गुटखा विक्रीचा धंदा चालविणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले. त्यामुळे जिल्ह्यातील नागरिकांनी कारवाईबाबत समाधान व्यक्त केले. परंतु, पोलिसांची कारवाई फक्त दिखावाच असल्याची चर्चा सध्या जोरात सुरू आहे. पान टपरीपासून ठिकठिकाणी छुप्या पद्धतीने चढत्या दराने गुटखा विकला जात आहे. १५ ते २० रुपयांना मिळणारा गुटखा ३५ ते ४० रुपयांना विकला जात आहे. त्यामुळे हा धंदा जिल्ह्यात तेजीत सुरु असल्याचे चित्र आहे. मात्र, या गुटख्याची वाहतूक कोणाच्या कृपेने होते, हा प्रश्न उपस्थित केला जात आहे. जिल्ह्यामध्ये गुटखा विक्री, वाहतुकीवर बंदी असतानाही छुप्या पद्धतीने हा धंदा चालविला जात आहे. त्यामुळे पोलिसांच्या कारवाईबाबत प्रश्न उपस्थित केला जात आहे. या अवैध धंद्याबाबत रायगडच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल काय भूमिका घेणार, याकडे लक्ष लागून राहिले आहे.

पोलीस अधीक्षक आचल दलाल यांनी कारभार हाती घेताच, अवैध धंदेवाल्यांना धडकी भरवणारी धडक कारवाई सुरू केल्याने त्यांचे धाबे दणाणले आहेत. परंतु, पोलीस दलातील काही अधिकाऱ्यांचा अवैध धंदेवाल्यांशी अर्थपूर्ण संबंध असल्याची चर्चा असून, त्यामुळे कारवाईस टाळाटाळ होत असून, चोरी छुपे मटका, जुगार जोरात सुरू असल्याचे बोलले जात आहे. अर्थपूर्ण संबंध जपणारे ते अधिकारी कोण, असा सवाल विचारला जात आहे.

## ...कोल्हापूरला वगळलं

नांदेड, परभणी, बीड, लातूर, धाराशिव, सोलापूर, सांगली, कोल्हापूर, सिंधुदुर्ग या १२ जिल्ह्यांतून शक्तीपीठ महामार्ग जाणार आहे. हा महामार्ग सहा पदरी असेल. महामार्गावर २६ ठिकाणांवर इंटरचेंज असेल. ४८ मोठे पूल, ३० बोगदे, आठ रेल्वे क्रॉसिंग असतील. शक्तिपीठ महामार्गासाठी तब्बल ८६ हजार कोटी रुपयांचा खर्च येणार आहे.

## अलिबागच्या शिरपेचात मानाचा तुरा

त्यांचे सर्वांत मोठे योगदान म्हणजे त्यांनी अँटी स्नेक वेनम या औषधाची निर्मिती केली. ज्यामुळे विषारी सापांच्या दंशामुळे होणाऱ्या मृत्यूंवर नियंत्रण मिळवता आले. त्यांचे हे कार्य केवळ व्यावसायिक यश नसून, ग्रामस्वराज्याचा एक आदर्श म्हणून पाहिले जाते. डॉ. ढवण यांचा हा सन्मान ग्रामीण भारताच्या उद्योजकतेचा आणि समाजसेवेचा गौरव मानला जातो.

**पनवेल महानगरपालिका**

**वैद्यकीय आरोग्य विभाग**

**कार्यालय :- देवाळे तलावाच्या समोर गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल - ४१०२०६.**

दुरध्वनी कार्यालय : ०२२- २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२- २७४५२२३३
उपायुक्त कार्यालय : ०२२- २७४५५७५१ आयुक्त कार्यालय : ०२२- २७४५२३३९
ई-मेल : panveleorporation@gmail.com वेबसाईट: www.panvelcorporation.com

जा.क्र./पमपा/वै.आ.वि/९११/सन २०२५-२६ दिनांक : २८/०८/२०२५

**जाहिर सुचना**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील मुत्रपिंड आजाराने ग्रस्त असलेल्या नागरिकांना पालिकेमार्फत मोफत डायलॅसीस सेवा उपलब्ध करुन देणेकामी पालिकेने खारघर व नवीन पनवेल येथे ०२ डायलॅसीस युनिट (प्रत्येकी २५ खाटांचे) सेंटर कार्यान्वित करण्यात येणार आहे. या डायलॅसिस युनिटमध्ये उपचार घेणाऱ्या रुग्ण व डायलॅसिस सेंटरमधील कापडचोपड (Linen & Cloths) ची धुलाई, सफाई व इस्त्री करुन घेणेकामी अंदाजपत्रक बनविण्यासाठी खालील नमुद केलेल्या बाबींकरिता बाजारभाव दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र | कामाचे नाव | मुदत |
|---|---|---|
| १ | पनवेल महानगरपालिकेच्या ०२ डायलेसीस युनिटमधील रुग्णांसाठी डायलेसीस सेंटरमध्ये वापरण्यात येणाऱ्या कापडचोपड (Linen & Cloths) ची धुलाई, सफाई व इस्त्री करुन घेणेकामी. | २८/०८/२०२५ ते ०४/०९/२०२५ दुपारी ३.००वाजेपर्यंत |

**कामाचा तपशिल खालीलप्रमाणे:**

| Sr. no | Category of Linen | Items Included | Quantity (Per item Linen) | Rate Per Item ( including all Taxes) |
|---|---|---|---|---|
| | | Gloves Bag | 01 item | |
| | | Neonatal Frock | 01 item | |
| | | Baby Napkin | 01 item | |
| | | Mops | 01 item | |
| | | Caps etc | 01 item | |
| | | Baby Frock | 01 item | |
| | | Baby Shirt | 01 item | |
| 1 | Small | Baby pant | 01 item | |
| | | Baby Wrapper | 01 item | |
| | | Operation Towel | 01 item | |
| | | Patient Towel | 01 item | |
| | | Pillow Cover | 01 item | |
| | | Screen Towel | 01 item | |
| | | Eye Towel etc | 01 item | |
| | | Abdominal Hole sheet | 01 item | |
| | | Female Patient Gown | 01 item | |
| | | Green Screen 3 fold | 01 item | |
| | | Honeycomb Towel | 01 item | |
| 2 | Medium | Leggings | 01 item | |
| | | Operation Draw sheet | 01 item | |
| | | Surgeon pant | 01 item | |
| | | Patient Shirt | 01 item | |
| | | Window curtain Green | 01 item | |
| | | Table cloth | 01 item | |
| | | Plain Sheet etc. | 01 item | |
| | | Bed Sheets, | 01 item | |
| 3 | Big | Solapuri chaddar etc. | 01 item | |
| | | Blanket | 01 item | |

४. सीलबंद दरपत्रके दिनांक ०४.०९.२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत पनवेल महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागात स्वीकारण्यात येतील.
५. प्राप्त झालेली दरपत्रके शक्यतो दिनांक ०४.०९.२०२५ रोजी दुपारी ३.३० वाजता (शक्यतो) उपस्थितीत ठेकेदार यांच्या समक्ष उघडण्यात येतील.
६. अटी व शर्तीयुक्त दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही.

सही/-
**(प्रसेनजित कारलेकर)**
**उपायुक्त (आरोग्य)**
पनवेल महानगरपालिका

जा.क्र./पमपा/वै.आ.वि/९११/सन २०२५-२६ जाहिर सुचना क्र. MHo/०४/२०२५-२६.
दिनांक : २८.८.२०२५

# कृषीवल गणेश दर्शन स्पर्धा २०२५



• स्व.नामदेव श्रीकृष्ण मापगावकर यांच्या घरातील महाराजा गणपती मु.मापगाव, ता.अलिबाग. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)



• श्री. प्रसाद उर्फ पिंट्या सुधीर गायकवाड, मु.चोंढी,ता.अलिबाग यांच्या निवासस्थानी विराजमान गणपती. (छायाचित्र :-अब्दुल सोगावकर)



• श्री. अमोल हाके मु.मुनवली, ता.अलिबाग. (छायाचित्र- अब्दुल सोगावकर)



• श्री. रमेश मारुती हाके मु.मुनवली, ता.अलिबाग. (छायाचित्र- अब्दुल सोगावकर)



• शेकाप नेते श्री. अशोक शांताराम नाईक, मु.चोरोंडे, ता.अलिबाग. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)



• श्री. मोहन पांडुरंग खोत आणि परिवार मु.मापगांव, ता.अलिबाग. (छायाचित्र -अब्दुल सोगावकर)



• श्री. हेमंत रामचंद्र नेमन आणि परिवार मु.चोरोंडे ता.अलिबाग. (छायाचित्र- अब्दुल सोगावकर)



• शेकाप कार्यकर्ते श्री. उदय यशवंत घरत, मु. चोरोंडे, ता.अलिबाग. (छायाचित्र- अब्दुल सोगावकर)



• श्री. प्रतिक भालचंद्र खारकर (बामणगाव)



• श्री. नंदकुमार रघुनाथ ठाकूर, मु.किहीम-कामथ,ता.अलिबाग यांच्या निवासस्थानी विराजमान दीड दिवसीय गणपतीचे दर्शन घेताना किहीम सरपंच श्री. प्रसाद उर्फ पिंट्या सुधीर गायकवाड. (छायाचित्र- अब्दुल सोगावकर)



• माजी पोलीस पाटील कै. परशुराम हरी पाटील यांच्या कुटूंबाचा एकत्रित गणपती, मु.कामार्ले, ता.अलिबाग. (छायाचित्र- अब्दुल सोगावकर)



• श्री. विशाल दत्तात्रेय शेट्ये मु.किहीम ता.अलिबाग यांच्या निवासस्थानी विराजमान दीड दिवसीय गणपतीचे दर्शन घेताना. किहीम सरपंच श्री. प्रसाद उर्फ पिंट्या सुधीर गायकवाड. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)



• किहीम सरपंच श्री. प्रसाद उर्फ पिंट्या सुधीर गायकवाड,मु.चोंढी, ता.अलिबाग यांच्या निवासस्थानी विराजमान गणपती दर्शन घेताना आदिवासी बांधव. (छायाचित्र-अब्दुल सोगावकर)



• श्री. दशरथ गोपाळ खारकर (बामणगाव) यांच्या निवासस्थानी गणेश दर्शन घेताना श्री. प्रतिक भालचंद्र खारकर.



• श्री. सतिश पाटील व समीर पाटील आणि परिवार मु. मापगाव, ता.अलिबाग. (छायाचित्र-अब्दुल सोगावकर)



• त्रिंबक विनायक कुंटे आणि परिवार (कुंट्यांचा गोकुळ गणेश) कुंट्यांची गोठी पो. बामणगाव, अलिबाग रायगड



• श्री. विजय विष्णु आमले (चोंढी)




• अनिकेत विकास पाटील आणि पाटील परिवार देखाव्याचे नाव- श्री. केदारनाथ ज्योतिर्लिंग मंदिर (केदारनाथ धाम) मू. म्हात्रोळी, सारळ



• माणगाव येथील सर्जन डॉ. सचिन चव्हाण यांच्या निवासस्थानी विठ्ठलाच्या प्रतिकृतीसह आकर्षक सजावट करुन स्थानापन्न करण्यात आलेले गणराय (छायाचित्र : सलीम शेख, माणगाव)

# लढाईच्या गप्पा

अमेरिकेने लागू केलेल्या ५० टक्के आयातशुल्काची अंमलबजावणी बुधवारपासून सुरु झाली. यामुळे भारतातून अमेरिकेला निर्यात होणाऱ्या वस्तूंवर तिकडे ५० टक्के वा त्याहूनही अधिक असे आयातशुल्क लागेल. त्यामुळे त्या वस्तू महाग होतील. त्यांची मागणी कमी किंवा बंद होईल. त्या निर्यात करणाऱ्या भारतीयांचा धंदा बसेल. भारताला धडा शिकवणे हाच डोनाल्ड ट्रम्प यांचा उद्देश आहे. त्यामुळे आधी त्यांनी २५ टक्के शुल्क लागू केले. तेही इतर देशांच्या तुलनेत अधिक होते. नंतर त्यांनी एकाएकी आणखी २५ टक्के शुल्क लागू केले. भारत रशियाकडून क्रूड तेल खरेदी करतो व त्यामुळेच युक्रेन युद्ध चालू ठेवण्यासाठी रशियाला पैसे मिळत राहतात असे कारण ट्रम्प यांनी त्यासाठी दिले. भारतापेक्षाही अधिक तेल चीन रशियाकडून आयात करतो. भारताने हे सर्व जगात सांगण्याचा प्रयत्न केला. पण ट्रम्प यांनी त्याला दाद दिलेली नाही. रशियाचे अध्यक्ष पुतीन यांच्यासोबत मध्यंतरी ट्रम्प यांनी अलास्कामध्ये बैठक घेतली. मात्र तिच्यात युक्रेन युध्द थांबवण्याबाबत काही मार्ग निघाला नाही. नंतर युक्रेनचे अध्यक्ष झेलेन्स्की ट्रम्प यांना वॉशिंग्टनमध्ये जाऊन दुसऱ्यांदा भेटले. त्यात रशिया, युक्रेन व अमेरिका यांची तिघांची शिखर बैठक घेण्याची तयारी ट्रम्प यांनी दर्शवली. पण त्या प्रस्तावावर रशियाने काहीच उत्तर दिले नाही. त्या सगळ्याची शिक्षा भारताला मिळत आहे. भारताचे नाक दाबले की रशियाचे तोंड उघडेल असे ट्रम्प यांना वाटते. त्यासाठी त्यांनी हा मार्ग निवडला आहे. वास्तविक काहीच महिन्यांपूर्वीपर्यंत ट्रम्प भारताला आपला मित्र मानत होते. पण या मित्राला आता ते सर्वात कडक अशी शिक्षा त्यांनी देऊ केली आहे. नरेंद्र मोदी यांच्या मिठ्या मारणे, अहमदाबादेत त्यांचे जंगी स्वागत करणे वगैरे सर्व वाया गेले आहे. मोदी आणि भाजपच्या मूर्ख भक्तांसाठी हा चांगला धडा आहे. मोदींनी सर्व लाजलज्जा सोडून आणि भारताचा सन्मान गहाण टाकून अगली बार ट्रम्प सरकार अशी घोषणा दिली. पण ट्रम्प यांनी तिचे स्मरण ठेवले नाही. परराष्ट्र संबंध अशा घोषणा आणि फालतूची भाषणबाजी यांच्यावर ठरत नसतात.

## मासळी निर्यातीला फटका

अमेरिकेच्या ५० टक्के आयातशुल्कामुळे आपले कापड, जडजवाहिर, हिरे तसेच कोळंबीसारखी मासळी प्रचंड महाग होणार आहे. त्यामुळे येथील निर्यातदारांवर कुऱ्हाड कोसळली आहे. आता अमेरिकेला होणाऱ्या एकूण निर्यातीपैकी ६६ टक्के निर्यातीला याचा फटका बसणार आहे. औषधे, मोबाईल व इलेक्ट्रॉनिक वस्तू यांच्यावर अजूनही शून्य टक्के आयातशुल्क राहणार आहे. त्यामुळे त्या धंद्याला फटका बसणार नाही. पण ट्रम्प हा अत्यंत लहरी व बेदरकार इसम आहे. त्याच्या मनात आले तर तो एका क्षणात या उद्योगांनाही पट्ट्यात घेऊ शकतो. सध्या भारतातून सुमारे अडीचशे कोटी डॉलरची म्हणजे सुमारे २१ हजार कोटी रुपयांची कोळंबी अमेरिकेला जात होती. मुख्यतः आंध्र प्रदेश व पूर्वेकडच्या राज्यांमधून ती जाते. महाराष्ट्राला इतका मोठा किनारा असूनही आपण याबाबत दरिद्री राहिलो आहोत. आपले मत्स्यविकासमंत्री डुकरांच्या जयंत्या साजऱ्या करण्यात आणि मुसलमानांना धमक्या देण्यात मग्न आहेत. त्यांना अमेरिकेसोबतच्या या पेचप्रसंगाची माहिती तरी असेल का याची शंका आहे. आजवर आपल्या कोळंबीवर शून्य टक्के शुल्क होते. आता एकदम ते सुमारे साठ टक्के होणार आहे. त्यामुळे जगातील इतर देशांच्या तुलनेत ते प्रचंड महाग होणार आहे. हीच स्थिती हिरे उद्योगाची आहे. आजवर या उद्योगातून एक हजार कोटी डॉलर म्हणजे सुमारे ऐंशी हजार कोटी रुपयांची निर्यात होत होती. त्यांच्यावर केवळ दोन टक्के शुल्क होते. आता ते ५२ टक्के झाले आहे. त्यामुळे त्यांची अमेरिकेतील मागणी एकदम खाली येणार आहे. हिरे किंवा जडजवाहिर ही काही अत्यावश्यक खरेदी नाही. त्यामुळे ती एका क्षणात बंद होऊन जाणार आहे. या हिऱ्यांची कटाई व पॉलिश करणारे सुरतच्या कारखान्यांमध्ये आधीच मंदी होती. आता तर ते पूर्णपणे झोपणार आहेत. तेथील लक्षावधी कामगार बेकार होणार आहेत.

## आता तरी जागे व्हा

कापड उद्योगाची हीच अवस्था आहे. आपल्याकडे भिवंडी, मालेगाव किंवा तमिळनाडूतील तिरुपूर इथे तयार होणारे कपडे स्वस्त असल्याने अमेरिकेत त्यांना मागणी होती. त्यांचीही निर्यात सुमारे नव्वद हजार कोटी रुपयांच्या घरात होती. पण आता ५० टक्के किंवा अधिकच्या शुल्कामुळे हे कपडे महाग होणार आहेत. त्या मानाने व्हिएतनाम, बांगलादेश इत्यादींमधले कपडे स्वस्त असतील. ते आपला धंदा मारतील. हाती बनवलेल्या वस्तू, चामड्याच्या वस्तू, तांदुळ, मसाले अशा इतर काही गोष्टींनाही या वाढीव शुल्काचा फटका बसणार आहे. कमीअधिक प्रमाणात या सर्व क्षेत्रांमधील रोजगार नाहीसे होणार आहेत. याबाबत आपल्या सरकारने अजूनही खूप तातडीने काही हालचाली केल्याचे दिसत नाही. आपल्या वाटाघाटी चालू आहेत एवढेच सरकार सांगते. मोदी पुढच्या महिन्यात अमेरिकेला जाणार आहेत. त्यातून कदाचित अधिकचे २५ टक्के शुल्क कमी केले जाईल. पण मूळ २५ टक्के सहजासहजी हटेल असे वाटत नाही. आपण अमेरिकेसमोर झुकणार नाही असे नरेंद्र मोदी ओरडून सांगत आहेत. लाल किल्ल्यावरही त्यांनी ते बोलून टाळ्या मिळवल्या. पण प्रत्यक्षात त्यांच्या सरकारने गुढगे टेकायला सुरुवात केली आहे. आयात होणाऱ्या कापसावरचे ११ टक्के आयातमोदी सरकारने काढून टाकले आहे. त्यामुळे भारताबाहेरून येणारा कापूस स्वस्त होईल व येथील कापूस पडून राहील. इथला शेतकरी मरेल. हे सर्व अमेरिकेच्या इच्छेनुसार चालू आहे. भारताने सोयाबीन, मका, गहू, दूध, चीज, मांस इत्यादींवरचे आयातशुल्क काढून टाकावे अशी अमेरिकेची मागणी आहे. प्रत्यक्षात या सर्व वस्तू आपल्याकडेच भरपूर उपलब्ध असून त्यांच्या शेतकऱ्यांना पुरेसे पैसे मिळत नाहीत अशी स्थिती आहे. अमेरिकेतून स्वस्तात त्या येऊ दिल्या तर इथल्या शेतकऱ्यांचे मरण ओढवेल. यात कापसाच्या मुद्द्यावर मोदी सरकारने कच खाल्ली आहे. आता मागच्या दाराने सोयाबीन, मका आणि दूधदेखील भारतात येईल अशी भीती निर्माण झाली आहे. ट्रम्प इतक्या दिवसांपासून मोदी व भारताचा अपमान करीत आहेत. पण त्यांचे नाव घेऊन त्यांना प्रत्युत्तर देण्याचे धाडस आपल्या छप्पन इंची छातीवाल्या मोदींना दाखवता आलेले नाही. अजूनही ते बनियाच्या भूमिकेत असून काहीतरी जुगाड करून यातून बाहेर पडू पाहत आहेत. असा नेता तोंडाने कितीही युध्दाच्या आणि शौर्याच्या बाता करीत असला तरी खासगीत कधी आपल्याच लोकांचा खिसा कापू देईल हे सांगता येत नाही. जनतेचे डोळे आता तरी उघडतील अशी आशा आहे.

---

विचार

# थायलंडमधील अस्थिर सरकारची परंपरा कायम

***थायलंड आणि कंबोडियामध्ये बऱ्याच काळापासून सीमावाद आहे; अलिकडेच दोन्ही देशांनी एकमेकांवर हल्ला केला. त्यात अनेक नागरिकांचा मृत्यू झाला, एक लाखाहून अधिक लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवावे लागले. दरम्यान, थायलंडचे पंतप्रधान शिनावात्रा यांनी कंबोडियाला केलेला फोन कॉल लीक होऊन धक्कादायक माहिती समोर आली. यामुळे पंतप्रधानांना पदच्युत करण्यात आले. अर्थात तिथे अस्थिर सरकारची परंपराच आहे.***



**- प्रा. जयसिंग यादव**

थायलंड आणि कंबोडियामधील वादाचे मूळ प्रत्यक्षात दोन्ही देशांमधील मैत्रीतील दरी हे आहे. शिनावात्रा कुटुंब बराच काळ थायलंडच्या राजकारणाचा भाग आहे. थाक्सिन शिनावात्रा हे शिनावात्रा कुटुंबाचे प्रमुख मानले जातात. त्यांनी २००० च्या दशकात पहिल्यांदा देशाच्या राजकारणात प्रवेश केला. त्यांनी थाईक थाई पक्षाची स्थापना केली आणि २००१ च्या सार्वत्रिक निवडणुकीत प्रचंड विजय मिळवला. राजकारणात त्यांचा दीर्घकाळ प्रभाव असण्याची अनेक कारणे आहेत. पहिली गोष्ट म्हणजे त्यांनी अनेक प्रगतीशील धोरणे स्वीकारली. थायलंडच्या राजकारणाला नवीन वळण दिले. त्यांच्या आगमनापूर्वी देशात कोणतेही कल्याणकारी धोरण नव्हते. ते देशातील गरिबांच्या समस्या सोडवण्याचा प्रयत्न करणारे पहिले नेते होते. त्यांच्या विरोधकांच्या युतीला 'यलो शर्टस' म्हणतात. त्यात बहुतेक शहरी मध्यमवर्गीय लोक आणि राजेशाही समर्थकांचा समावेश होता. २००६ मध्ये थाक्सिन शिनावात्रा यांच्या सरकारवर भ्रष्टाचार आणि देशाच्या राजाशी निष्ठा नसल्याचे आरोप लावण्यात आले. जनतेने त्यांच्याविरुद्ध रस्त्यावर उतरून जोरदार निदर्शने केली. त्यानंतर लष्कराने त्यांना पदच्युत केले. २००८ मध्ये थाक्सिन शिनावात्रा देश सोडून गेले आणि २०२३ मध्ये परतले. त्यांच्या थायरेक थाई पक्षावर बंदी घालण्यात आली. त्यानंतर त्यांनी प्रोथाई नावाने एक पक्ष स्थापन केला. देशाचे चार पंतप्रधान शिनावात्रा कुटुंबातून आले; परंतु प्रत्यक्षात थाक्सिन पडद्यामागे राहून सरकारचे महत्त्वाचे निर्णय घेत होते. २०२३ च्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये तरुणांच्या नेतृत्वाखालील 'मूव्ह फॉरवर्ड पार्टी'ला बहुमत मिळाले; परंतु सरकार स्थापन करण्याची संधी मिळाली नाही.

थायलंडच्या संवैधानिक न्यायालयाने निवडणुकीदरम्यान दिलेल्या आश्वासनाचा हवाला देत तरुणांच्या पक्षाला बरखास्त केले. राजेशाहीचा अपमान करणे हा देशात गुन्हा आहे. यानंतर, प्रोथाई पक्षाने प्रतिस्पर्धी पक्षांशी युती करून सरकार स्थापन केले. ऑगस्ट २०२४ मध्ये संसदेने प्रोथाई पक्षातील एका पंतप्रधानाला काढून टाकले आणि त्यांच्या जागी थाक्सिन शिनावात्रा यांची मुलगी पतोंगटार्न शिनावात्रा यांना पंतप्रधान म्हणून निवडले. त्यांच्याकडे कमकुवत पंतप्रधान म्हणून पाहिले जात होते. पंतप्रधान झाल्यानंतर, थाक्सिन यांनी सरकारी धोरणांवर उघडपणे बोलण्यास सुरुवात केली. या टिकेमुळे त्यांच्या पंतप्रधान मुलीची विश्वासार्हता नष्ट झाली. त्यातच थायलंडचे पंतप्रधान आणि कंबोडियाच्या संसदेचे अध्यक्ष आणि माजी पंतप्रधान हुन सेन यांच्यातील दूरध्वनी संभाषण लीक झाले. पतोंगटार्न सीमेवरील संघर्ष थांबवून शांतता प्रस्थापित करू इच्छित होत्या. या संभाषणादरम्यान, पतोंगटार्न शिनावात्रा यांनी हुन सेन यांना काका म्हणून संबोधले. ते खूप धाडसीपणे बोलत असल्याचे दिसले.

हुन सेन आणि पतोंगटार्न यांचे वडील जवळचे मित्र आहेत आणि कदाचित म्हणूनच पतोंगटार्न या हुन सेन यांच्यांशी अतिशय विनम्रपणे बोलल्या आणि शांतता प्रस्थापित करण्यासाठी त्यांच्या मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. यानंतर एका प्रमुख रूढीवादी पक्षाला सरकारमधून बाहेर काढण्यात आले आणि देशभरात पतोंगटार्न यांच्याविरुद्ध व्यापक निदर्शने झाली. त्यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली. त्यांनी संवैधानिक न्यायालयात युक्तिवाद केला, की शांतता कराराच्या रणनीतीचा भाग म्हणून आपण कंबोडियन नेत्यांशी अशा प्रकारे चर्चा केली; परंतु संवैधानिक न्यायालयाने त्यांच्याविरुद्ध चौकशी सुरू करत निलंबित केले.

थायलंडची लोकशाही कमकुवत आहे. थायलंडमध्ये निवडणुका होतात आणि तेथे संसददेखील आहे; परंतु २० वेळा संविधान बदलण्यात आले असून १३ वेळा सरकारे उलथवण्यात आली आहेत. १९३२ पासून न्यायव्यवस्थेने अनेक वेळा प्रशासनात हस्तक्षेप केला आहे. इतर देशांमध्ये कार्यकारी मंडळ सरकारी प्रशासन चालवते; परंतु येथे सैन्य आणि राजेशाहीदेखील आहे. १९९२ पासून थायलंडमध्ये संवैधानिक राजेशाही आहे, म्हणजेच राजा हा देशाचा प्रमुख असतो; परंतु संविधानावर आधारित नियमांनुसार सत्ता सरकारच्या हातात असते. लष्कराला सत्तापालट करायचा असला तरी ते थायलंडच्या राजाच्या संमतीशिवाय होऊ शकत नाही. लष्कराने २०१४ मध्ये सत्तापालट केला होता. पूर्वी लष्करी सत्तापालटाचे सूत्र थायलंडच्या राजकारणाचा एक भाग होते. त्याची सुरुवात संविधान बदलण्यापासून व्हायची. त्यानंतर निवडणुका व्हायच्या आणि सरकारवर भ्रष्टाचाराचे आरोप व्हायचे. ते राज्य करण्याचा नैतिक अधिकार गमावायचे, त्यानंतर लष्कराकडून सत्तापालट व्हायचा. यानंतर, सत्ता हस्तगत करणारे लष्करी जनरल नवीन संविधान तयार करायचे. तिथे अनेक वेळा सत्तापालट झाला आहे. लष्कराने देशात अनेक वेळा सत्तापालट केले आहेत, आता प्रश्न असा उद्भवतो की हे पुन्हा घडू शकते का? थायलंडच्या कमकुवत लोकशाही व्यवस्थेमुळे सैन्य सत्ता हस्तगत करण्याची शक्यता नेहमीच असते. सध्याचे संविधान हे देशाचे विसावे संविधान आहे. २०१७ मध्ये लष्करी राजवटीत ते स्वीकारण्यात आले. हे संविधान लष्कराच्या देखरेखीखाली असलेल्या सैन्यसमर्थक समितीने तयार केले आहे. त्यात असे अनेक कायदे आहेत, ज्यात राजकीय पक्ष आणि राजकारण्यांना कमकुवत ठेवता येते. या अंतर्गत राजकीय पक्ष आणि राजकारण्यांना बंदी घालता येते. न्यायव्यवस्थेच्या सहकार्याने या संविधानाखाली सरकारांना अस्थिर आणि कमकुवत ठेवता येते. संवैधानिक न्यायालयाने गेल्या २० वर्षांमध्ये सहा पंतप्रधानांना निलंबित केले आहे. देशाच्या कमकुवत लोकशाही व्यवस्थेमुळे हे शक्य झाले आहे.

कंबोडिया आणि थायलंडमधील संबंध नेहमीच तणावपूर्ण राहिले आहेत. दोन्ही देशांमध्ये जमिनीवरून बराच काळ वाद आहे. दोन्ही बाजूंनी या मुद्द्यावर राष्ट्रवादी भावना वर्चस्व गाजवतात आणि एकमेकांकडे संशयाने पाहतात. त्याच वेळी दोन्ही देशांच्या राजकीय कुटुंबांमधील, म्हणजेच शिनावात्रा आणि हुन कुटुंबांमधील वैयक्तिक राजनैतिक संबंधांमुळे, परिस्थिती कधीही स्फोटक बनू शकते. असे घडते, तेव्हा दोन्ही देशांमधील सीमा बंद होतात. या वेळीही थायलंडने काही तेल पाइपलाइन बंद केल्या. कंबोडियाने थायलंडमधून फळे आणि अन्नपदार्थांच्या आयातीवर बंदी घालून प्रत्युत्तर दिले. परिस्थिती तणावपूर्ण होते, तेव्हा दोन्ही देश सीमेवर आपले सैन्य तैनात करतात. हे अनेकदा घडते; परंतु दोन्ही देशांच्या नेत्यांमधील टेलिफोन संभाषण लीक झाल्यामुळे परिस्थिती आणखी बिकट झाली. दोन्ही देशांच्या प्रमुख राजकीय कुटुंबांचे अनेक दशकांपासून जवळचे संबंध आहेत. थाक्सिन यांना थायलंडच्या पंतप्रधानपदावरून काढून टाकण्यात आले, तेव्हा हुन सेन कंबोडियाचे पंतप्रधान होते. त्यांनी थाक्सिन यांना वरिष्ठ सल्लागार म्हणून कंबोडियाला आमंत्रित केले होते. हुन सेन हे ३०-३५ वर्षांपासून कंबोडियाच्या राजकारणात आहेत आणि तत्कालीन पंतप्रधान हुन मानेट यांचे वडील आहेत. हुन सेन यांचे पुत्र उपपंतप्रधान आहेत. या सर्व तथ्यांकडे पाहता, थायलंडच्या पंतप्रधानांनी त्यांना फोन करणे स्वाभाविक वाटते.

आग्नेय देशांमध्ये, एखाद्या राजकारण्याने दुसऱ्या देशातील वरिष्ठ राजकारण्याला काका, भाऊ किंवा बहीण असे संबोधणे सामान्य आहे. कंबोडियाचे माजी पंतप्रधान हुन सेन यांनी फोन कॉल लीक होण्याचे समर्थन केले आणि म्हटले की त्यांनी पारदर्शकता राखण्यासाठी असे केले; जेणेकरून संभाषणाचा वेगळा अर्थ काढला जाऊ नये. हा एक अनौपचारिक राजनैतिक प्रयत्न होता. असे असले, तरी एखाद्या देशाच्या पंतप्रधानांचे कॉल लीक करणे हे योग्य पाऊल मानले जाऊ शकत नाही. हुन सेन कंबोडियाच्या परराष्ट्र धोरणावर आपली पकड असल्याचे दाखवू इच्छित असतील. ते याद्वारे देशाच्या आर्थिक समस्यांवरून लोकांचे लक्ष वळवू इच्छित असतील. थायलंड हा आग्नेय आशियातील एक प्रमुख निर्यातदार असून परकीय भांडवल गुंतवणूक आकर्षित करत आहे; परंतु गेल्या वीस वर्षांमध्ये राजकीय अस्थिरतेमुळे हा देश या बाबतीत शेजारील देशांपेक्षा मागे पडला आहे. सध्याच्या अस्थिरतेमुळे थायलंडसाठी फायदेशीर करार करणे सोपे होणार नाही. देशातील अस्थिर आघाडी सरकारला जगासोबतच्या व्यापार धोरणांवर लक्ष केंद्रित करणे कठीण होत चालले आहे. थायलंडमध्ये जून २०२७ पूर्वी सार्वत्रिक निवडणुका होणार आहेत; परंतु अशी भीती आहे की मध्यावधी निवडणुका झाल्या तरी परिस्थितीत बदल होणे अवघड आहे.

---

चर्चा आजची

# बा गणराया, सद्बुध्दी दे ............

**सुयोग आंग्रे**

जगातील अनेक देशांमध्ये भक्तांच्या लाडक्या बाप्पांचे धुमधडाक्यात आगमन झाले आहे व सगळे गणेशोत्सवाच्या जल्लोषात दंग झाले आहेत. घरोघरी झालेल्या बाप्पांच्या आगमनाबरोबरच महानगरापासून गावखेड्यापर्यंतच्या सार्वजनिक गणेशोत्सवातील गणेश मूर्तींचीही उत्साहात स्थापना झाली आहे. लाडक्या बाप्पांचे आगमन सर्वांमधले सगळे भेदाभेद दूर करून चैतन्य, उत्साह व आनंदाचे वातावरण निर्माण करणारे असते. जसा गरीब बाप्पांच्या आगमनाने आनंदतो तसाच श्रीमंतही बाप्पांच्या चरणी भक्तिभावाने लीन होतो. कामानिमित्त शहरात गेलेले गणेश भक्त लाडक्या गणरायाच्या दहा दिवसांच्या सेवेसाठी आपापल्या गावात दाखल झाले आहेत. सर्वांना सद्बुद्धी दे आणि सुखात ठेव असे गाऱ्हाणे विघ्नहर्ता गणेशासमोर मांडले आहे. प्रत्यक्षात हे गाऱ्हाणे मांडले असलेतरी खरंच आजच्या समाजामध्ये सद्सद्विवेक बुद्धी जागी आहे काय आणि नसेलतर समाजात वाढत असलेले सामाजिक वैष्यम्यता दूर करण्याची बुद्धी समाजाला दे असे साकडे घालण्याची खरी गरज निर्माण झाली आहे. बाप्पा जसा सुखकर्ता आहे तसाच तो विघ्नहर्ता व दुःखहर्ताही आहे. त्यामुळे बाप्पांचे आगमन म्हणजे उत्सवाची नांदीच! आपल्या देशात तर उत्सवप्रियता ओथंबून वाहते त्यामुळे बाप्पांच्या आगमनाचा उत्सव तर दणक्यात साजरा होणे साहजिकच! त्यात वावगे काही नाहीच. उत्सव माणसाच्या जगण्याला प्रेरणा देतात, त्याला आशावादी व सकारात्मक बनवतात! ही सकारात्मक ऊर्जा प्रत्येकाला हवी असते व ती गणेशोत्सवातून मिळते. त्यामुळेच बाप्पांच्या आगमनाचा उत्सव सालोसाल वाढत जाणारा आहे. देशभर विशेषत: महाराष्ट्रात गणेशोत्सवापासून बाजारपेठेत उलाढाल प्रचंड वाढते व बाजारपेठेत एक अर्थचैतन्य निर्माण होते. हे अर्थ चैतन्य बाजारनपुरते मर्यादित आहे. पण वैचारिक पातळी उसाचं करणारे विचार चौसष्ट कलांचा अधिपती या समजलं देईल अशी भावना प्रत्येकाने मनात आणली तर वाढणाऱ्या समाजातील अविचारांना आळा बसवता येईल. विशेष म्हणजे ज्यांनी या सगळ्या अपप्रवृत्तींवर अंकुश ठेवला पाहिजे ते राज्यकर्ते व त्यांच्या हुकूमावर नाचणारे प्रशासन या धांगडधिंग्यात उत्साहाने सहभागी होताना दिसतात. राजकीय नेत्यांना उत्सवात मिळणारी आयती गर्दी आपले राजकीय व निवडणुकीचे गणित बसवणारी वाटत असल्याने खुणावते आणि मग जास्तीत जास्त गणेश मंडळांना, त्यांच्या पदाधिकाऱ्यांना आपलेसे करण्यासाठीची स्पर्धा राजकीय नेत्यांमध्ये रंगते. जे सत्तेवर आहेत ते अर्थातच या स्पर्धेत आघाडीवर असतात.

गणेश मंडळांना फुकट वीज देण्यापासून भर रस्त्यात मंडप घालून रस्ताच बंद करण्यापर्यंतच्या सगळ्या कामात सत्ताधारी मंडळी तात्पुरते मदतकार्य करत असते व त्यांच्या इशाऱ्यावर प्रशासन कार्यरत असते. त्यामुळे हल्ली राज्यात गणेशोत्सवच नव्हे तर सर्वच उत्सव, सार्वजनिक कार्यक्रम वगैरेमध्ये नियम पाळाच्या ऐवजी बिनधास्त नियम पायदळी तुडवा हाच ट्रेंड रूढ झाला आहे. राज्यकर्त्यांना, राजकीय नेत्यांना आपल्या मतदारांना नाराज करायचे नाही, कारण राजकीयदृष्ट्या ते त्यांना परवडणारे नाही. सध्याचे सार्वजनिक गणेशोत्सव खरेच ही आराधना करण्यासाठी आहेत का? असा प्रश्न खुद्द त्या बुद्धी दात्यालाही पडत असेल. बाप्पांना तरी हा सगळा प्रकार आवडत असेल का? हा प्रश्नही आपल्या मनात निर्माण होत नाही, हे समाजाचे दुर्दैवच म्हणावे लागेल. लोकमान्य टिळकांनी घरातला गणपती सार्वजनिक रूपात आणताना जो उद्देश बाळगला होता त्या उद्देशाला तर आपण केव्हाच तिलांजली दिली आहे. मात्र बाप्पांच्या आगमनाचा उत्सव साजरा करताना त्यामागे जो भक्तीभाव आहे त्याचाही आपल्याला पुरता विसर पडलाय की काय? असाच प्रश्न हल्ली वारंवार निर्माण होतोय त्यामुळे आता बुद्धिदात्या श्री गणेशालाच 'आम्हाला सद्बुद्धी द्या,' असे साकडे घालण्याची व राज्यातील संस्कृतीवर, भक्तीभावावर, सामाजिक स्वास्थ्यावर निर्माण झालेले हे विकृतीचे विघ्न व संकट दूर करा, असे मागणे करण्याचीच वेळ आली आहे. या विश्वात विविध क्षेत्र आहेत. प्रत्येक क्षेत्राचे सखोल ज्ञान कोणालाच नाही. तरीही जे काही ज्ञान आहे त्या जोरावर काही वेळी किती मिजास दाखवली जाते? अर्ध्या हळकुंडाने पिवळे होणे, म्हणतात ते हेच. ज्ञानी असलो तरी अहंकारी नसावे.

नम्र-शांत-विनयशील असावे, तर तुम्ही सर्वांना हवेहवेसे वाटणार. जो आवडतो सर्वांना तोची आवडे देवाला. स्वतःचे व्यक्तिमत्त्व म्हणजे स्वतःच्या चांगल्या-वाईट स्वभावाचा आरसा असतो. अर्थातच स्वभावात, वागणुकीत ओढून-ताणून आणलेला दिखावा अजिबात नको. कारण हे सोंग-ढोंग पुढे उघडे पडल्यावर तोंडावर आपटायला होते. नियतीच्या नियमानुसार खोटं फार काळ टिकत नाही. सत्य त्याला उघडे पाडतेच. चांगुलपणाचे खोटे मुखवटे तात्पुरतेच टिकणारे असतात. श्रीगणेशाला मनोभावे शरण जात त्याच्याकडे मला अहंकाराचा स्पर्शही होऊ देऊ नको. हे मागणे मागूया!

---

लोकसंसद

## कार्यकर्त्यांवर नियंत्रण ठेवा !

गणेशोत्सव काळात मुंबईतील लालबाग, परळ, खेतवाडी, गिरगाव ही खास आकर्षण केंद्र असतात. मुंबईतीलच नव्हे, तर राज्यासह देश विदेशातील भाविक, पर्यटक या ठिकाणी गणपती पाहण्यासाठी दरवर्षी गर्दी करतात. लांबच लांब रांगा, रस्त्यावरील विद्युत रोषणाई आणि विक्रेत्यांनी समस्त परिसर दिवस रात्र गजबजलेला असतो. या कालावधीत गणेश मंडळांच्या कार्यकर्त्यांना मात्र वेगळेच बळ आलेले असते. दूरवरचा प्रवास करून तासन तास रांगेत उभे राहणाऱ्या भक्तांना धक्काबुक्की करणे, त्यांच्याशी विनाकारण वाद घालणे, शिवीगाळ करणे, धमकावणे, स्त्रियांशी असभ्य भाषेत बोलणे, परिचयाच्या माणसांना रांगेत पुढे घेऊन जाणे यांसारखे प्रकार काही मंडळाच्या कार्यकर्त्यांकडून घडताना सर्रासपणे पाहायला मिळतात. कार्यकर्त्यांच्या आणि सुरक्षा रक्षकांच्या अरेरावीचे अनेक प्रसंग या ठिकाणी प्रतिदिन घडत असतात. त्यामुळे गणेशोत्सवाचा राजा नेमका कोण ? गणपती कि कार्यकर्ता हा प्रश्नच पडतो. कार्यकर्त्यांच्या अशा वागण्याने मंडळासह उत्सवाच्या प्रतिमेलाही धक्का लागतो. त्यामुळे अशा अतिउत्साही कार्यकर्त्यांवर मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी नियंत्रण ठेवण्याची नितांत आवश्यकता आहे. **– सौ. मोक्षदा घाणेकर**

## एका गौरवशाली युगाचा अंत

भारताच्या ज्या पहिल्यावहिल्या सुपरसॉनिक लढाऊ विमानाने १९६५ चे पाकिस्तानशी युद्ध, १९७१ चे बांगलादेश मुक्ती युद्ध आणि १९९९ च्या कारगिल युद्धात तसेच अनेक लष्करी कारवायांमध्ये मोलाची भूमिका बजावली होती ते मिग-२१ लढाऊ विमान ६ दशकांच्या गौरवशाली आणि संस्मरणीय सेवेनंतर सप्टेंबर २०२५ मध्ये निवृत्त होत आहे. १९६३ मध्ये भारतीय हवाई दलात सामील झालेल्या या मिग-२१ चे शेवटचे उड्डाण २६ सप्टेंबर २०२५ रोजी चंदीगड एअरबेसवर होणार असून येथेच त्याचा निरोप समारंभ आयोजित केला जाणार आहे. भारतीय हवाई दलातील सर्वात जास्त काळ सेवा देणारे मिग-२१ हे लढाऊ विमान मूलतः तत्कालीन सोव्हिएत युनियनमधील मिकोयान-गुरेविच यांनी विकसित केले होते. मिग-२१ चे जुने तंत्रज्ञान, मर्यादित एव्हिओनिक्स (आधुनिक इलेक्ट्रॉनिक्स विमान उड्डाण प्रणाली) आणि वाढत गेलेला देखभाल खर्च यांमुळे ते आता कालबाह्य झालेच, पण अलिकडच्या काळात मिग-२१ च्या अपघातांचे प्रमाण वाढत गेले. वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे आणि त्यात होणाऱ्या वैमानिकांच्या दुर्दैवी मृत्यूमुळे त्याला शेवटी 'उडणारी शवपेटी' (फ्लाइंग कॉफिन) असे म्हटले गेले हे फारच वेदनादायी होते. आता त्याची जागा तेजस, राफेल आणि अद्ययावत सुखोई ही लढाऊ विमाने घेणार आहेत. मिग-२१ च्या निवृत्तीमुळे भारतीय हवाई दलाच्या इतिहासातील एका गौरवशाली युगाचा अंत होत आहे. **–प्रदीप अनुसया शंकर मोरे**

---

दिनविशेष

# राष्ट्रीय क्रीडा दिन

२९ ऑगस्ट राष्ट्रीय क्रीडा दिन. हॉकीचे सर्वकालीन महान खेळाडू मेजर ध्यानचंद या महान खेळाडूचा गौरव म्हणून २९ ऑगस्ट हा दिवस राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून देशभर साजरा केला जातो. या दिवशी राष्ट्रपतींच्या हस्ते राजीव गांधी खेलरत्न पुरस्कार, अर्जुन पुरस्कार, द्रोणाचार्य पुरस्कारांचे वितरण करण्यात येते. शिवाय खेळातील सर्वोच्च जीवन गौरव पुरस्कार म्हणून २००२ पासून ध्यानचंद पुरस्कार देण्यात येतो. आपल्या कारकिर्दीत खेळात असामान्य कर्तृत्व दाखविणाऱ्या आणि निवृत्तीनंतरही त्या खेळासाठी जीवन वेचणाऱ्या क्रीडापटूला ध्यानचंद जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येते.

आजच्याच दिवशी १९०५ रोजी उत्तरप्रदेश मधील अलाहाबाद येथे मेजर ध्यानचंद यांचा जन्म झाला होता. त्यांचे वडील सोमेश्वर दत्त सिंग हे आर्मी मध्ये असल्याने त्यांच्या वारंवार बदल्या होत. वडिलांच्या निवृत्तीनंतर १९२२ साली वयाच्या १६ व्या वर्षी ते स्वतः आर्मीत दाखल झाले. त्यावेळी ते आर्मीच्या रेजिमेंटमध्ये होणाऱ्या हॉकी सामन्यात खेळताना त्यांचे हॉकीतील कौशल्य पाहून मेजर बाले तिवारी यांनी त्यांना हॉकीमधील बारकावे शिकवले. ते त्यांचे हॉकीमधील गुरु होते. पुढे मेजर ध्यानचंद हे हॉकीमध्ये इतके रमले की हॉकी म्हणजे त्यांचा जीव की प्राण ठरला. १९२२ ते १९२६ या कालावधीत त्यांनी रेजिमेंटच्या विविध स्पर्धांमध्ये आपले कौशल्य दाखवले. हॉकीतील त्यांच्या कर्तृत्वामुळे न्यूझीलंड दौऱ्यावर जाणाऱ्या इंडियन आर्मीच्या संघात त्यांची निवड झाली हा दौरा त्यांनी गाजवला. या दौऱ्यात त्यांनी आपल्या संघाला १८ विजय मिळवून दिले, दोन लढती बरोबरीत सुटल्या तर फक्त एका लढतीत पराभव स्वीकारला. हा दौरा त्यांच्यासाठी टर्निंग पॉईंट ठरला. या दौऱ्याने त्यांना जगभर नाव मिळवून दिले. या दौऱ्यानंतर त्यांना लान्स नायक म्हणून बढती मिळाली. केवळ भारतच नाही तर जगातील अनेक दिग्गज खेळाडू त्यांच्या खेळाच्या प्रेमात पडले. ध्यानचंद यांचे हॉकी खेळण्याचे कौशल्य अफलातून होते. चेंडूवरची नियंत्रण ही त्यांची खासियत होती. चेंडू त्यांच्या ताब्यात असताना, मैदानावर कोणी खेळत नाही असेच वाटायचे. चेंडू त्यांच्या स्टिक जवळून हलतच नसे म्हणून त्यांच्या स्टिक मध्ये चुंबक बसवला आहे अशी अफवा तेंव्हा पसरली होती.

हॉकी हा सांघिक खेळ आहे तो संघ भावनेनेच खेळला पाहिजे असे त्यांचे मत होते म्हणूनच चेंडूवर अफलातून नियंत्रण असूनही ते आपल्या सहकाऱ्यांना अचूक पास द्यायचे. हॉकीतील त्यांच्या या कौशल्यामुळेच त्यांना हॉकीतील जादुगार असे म्हटले जायचे. मेजर ध्यानचंद यांनी आपल्या जादुई खेळाने देशाला १९२८ (अँमस्टरडॅम) १९३२ (लॉस अँजेलीस) आणि १९३६ (बर्लिन) अशा सलग तीन ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये हॉकीत भारताला सुवर्णपदक जिंकून दिले होते. १९३६ मधील भारत जर्मनी यांच्यातील ऑलिम्पिकच्या अंतिम लढतीत ध्यानचंद यांच्या हॉकीतील कौशल्याने जर्मनीचा हुकूमशहा ऍडॉल्फ हिटलर यांनाही वेड लावले होते. त्यांच्या या असामान्य कौशल्याने भारावलेल्या हिटलर यांनी त्यांना जर्मन नागरिकत्व देण्याची तसेच इंग्लिश इंडियन आर्मीत मेजरपद व कर्नल पदापर्यंत बढती देण्याचीही ऑफर दिली होती, पण देशप्रेमी व स्वाभिमानी ध्यानचंद यांनी ती नम्रपणे नाकारली होती. लॉस अँजेलीसमध्ये खेळलेल्या भारतीय संघाचे वर्णन एका अमेरिकन पत्रकाराने पूर्वेकडील वादळ असे केले होते. ध्यानचंद १९५६ मध्ये निवृत्त झाले त्याचवर्षी भारत सरकारने त्यांना पद्मभूषण देऊन गौरवले. निवृत्तीनंतर पटियाला येथील राष्ट्रीय क्रीडा संस्थेत मुख्य प्रशिक्षक म्हणून त्यांनी तरुण खेळाडूंना प्रशिक्षण दिले. भारताला सुवर्णयुगाची अनुभूती देणाऱ्या या महान हॉकीच्या जादूगाराला मरणोत्तर भारतरत्न गौरवाने सन्मानित करावे अशीच तमाम भारतीय क्रीडा रसिकांची इच्छा आहे.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

२९ ऑगस्ट

१) श्री. सुर्यकांत दामोदर पाटील वरसोली, अलिबाग, २७-८-१९६४

२)श्री.जीवन काशिनाथ केळकर बाजारपेठ, अलिबाग २७-८-१९५३

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**तरुण नंदकुमार सक्सेरिया मुंबई**




**स्व. पुष्पा चंद्रकांत कोतेकर, स्मरणार्थ अलिबाग**



**कै. बळवंत शंकर कवळे, स्मरणार्थ अलिबाग**

## सुवर्णकण



विवेकाने सर्व विषयांचे स्वरूप लक्षात घेऊन सर्व विषयांचा मनाने त्याग करणे हाच दुःखातीत होण्याचा अचूक मार्ग आहे सदासर्वकाळ सुखी राहण्याचा मार्ग आहे.

**श्रीज्ञानेश्वर भावहृदय**
**आबामहाराज परांजपे**
**साधना आश्रम,**
**दातार आळी, पेण**

## कथालेखन, प्रश्नमंजुषा स्पर्धा

**कर्जत** : मुंबई विद्यापीठाच्या ५८ व्या सांस्कृतिक युवा महोत्सवाच्या कथालेखन मराठी, कथालेखन हिंदी किंवा इंग्रजी आणि प्रश्नमंजुषा स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धांमध्ये १२ महाविद्यालयातील ५४ विद्यार्थी सहभागी झाले होते. कोंकण ज्ञानपीठ राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयामध्ये कथालेखन मराठी, कथालेखन हिंदी किंवा इंग्रजी आणि प्रश्नमंजुषा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी मुंबई विद्यापीठाच्या रायगड जिल्हा स्तरीय विभाग समन्वयक डॉ. पराग कारूळकर, डॉ. सतीश पांडव, प्रा. अनिकेत इंदुलकर, प्रा. अक्षता गीध, प्रा. प्रिया खापे, प्रा. स्वीटी बार्शी, प्रा. तृणाली घुडे, प्रा. आशिया दाडेल आदी उपस्थित होते. या स्पर्धेमध्ये एकूण १२ महाविद्यालयांचे एकूण ५४ विद्यार्थी सहभागी झाले होते. या तीनही स्पर्धा मुंबई विद्यापीठाच्या एकूण १२ विभागामध्ये एकाच दिवशी, एकच वेळी आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेसाठी कर्जत, खालापूर, उरण आणि पनवेल या तालुक्यातील महाविद्यालये सहभागी झाली होती.

# दीड दिवसांच्या गणरायांना भावपूर्ण निरोप

## ● नगरपालिकेतर्फे विसर्जन स्थळांवर विद्युत रोषणाईसह विशेष व्यवस्था

**| रोहा | प्रतिनिधी |**

रोहा तालुक्यामध्ये दीड दिवसांच्या ६९८ गणरायांचे भावपूर्ण वातावरणात विसर्जन करण्यात आले. बुधवारी (दि.२७) श्री गणेशाचे आगमन झाले. गणरायांच्या आगमनावेळी पडलेल्या रिमझिम पावसामुळे भक्तगणांचा थोडा हिरमोड झाला होता. मात्र, विसर्जनाच्यावेळी पाऊस नसल्यामुळे मोठ्या आनंदाने, वाजतगाजत, ढोल-ताशांच्या आणि टाळ मृदुंगाच्या गजरात 'पुढच्या वर्षी लवकर या' असे म्हणत भक्तगणांनी आवडत्या गणरायाला निरोप दिला. यावेळी तालुक्यातील तसेच शहरातील विसर्जन स्थळांवार मोठी गर्दी झाली होती.

गणपती विसर्जनासाठी नगरपालिकेतर्फे विसर्जन स्थळांवर विशेष व्यवस्था आणि विद्युत रोषणाई करण्यात आली होती. रोहा शहरातील दमखाडी घाट, बंदर पकटी (बायपास रोड) जवळील घाट, अष्टमी कोळीवाडा येथील विसर्जन घाट व फरशी घाट अशी एकूण ४ प्रमुख विसर्जन घाटांची स्वच्छता करण्यात आली होती.



दुपारी ४ वाजल्यानंतर वाजत गाजत, काहीतर गुलाल उधळत, लेझिम, टाळ मृदुंग, ढोल ताशाच्या गजरात श्री गणरायांचे विसर्जन करण्यासाठी गर्दी उसळली होती. एका मागून एक घरगुती गणपती विसर्जनासाठी नदी किनारी निघाले होते. तत्पूर्वी महसूल आणि पोलीस प्रशासनाच्या वतीने दुपारी शहरातील विसर्जन स्थळांकडे जाणारे मार्ग मोकळे रहावेत यासाठी गस्त घालण्यात आली होती. भक्तगणांनी गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या असे गजर करीत कुंडलिका नदीकिनारी भावपूर्ण आणि भक्तीमय वातावरणात गणरायांचे विसर्जन केले. यावेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी रोह्याचे पोलीस निरीक्षक मारुती पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ३ अधिकारी, २५ अंमलदार, २२ होमगार्ड अशा पद्धतीचे पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आले होते. पोलिसांनी विसर्जन मार्गावर आणि नदी किनारी चोख बंदोबस्त ठेवले होते. तालुक्यात दीड दिवसांच्या एकुण ६९८ गणरायांचे विसर्जन करण्यात आले.

### कोलाड विभागात ७८० गणरायांचे विसर्जन

सुतारवाडी, कोलाड, खांब परिसरातील तलाव, कुंडलिका नदीपात्र व म्हीसदरा किनारी भावपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात गणरायांचे विसर्जन करण्यात आले. यावेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांनी विसर्जन मार्गावर आणि नदीकिनारी चोख बंदोबस्त ठेवले होते. कोलाड पोलीस स्टेशन हद्दीतील हद्दीतील व परिसरातील दिडदिवसांच्या एकुण ७८० गणरायांचे विसर्जन करण्यात आले असल्याची माहीती कोलाड पोलीस ठाण्याचे सहा. पो.निरीक्षक नितीन मोहिते यांनी दिली. यावेळी सर्व विसर्जनस्थळीचे निर्माल्य एकत्रित संकलन करून ते विशेष ठिकाणी पाठवण्यात आले.

### मुंबई-गोवा हायवेवर चोख बंदोबस्त

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर सुकेळी खिंड ते तीसे भुवनपर्यंत चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. कोलाड हद्दीतून जाणाऱ्या मुंबई-गोवा हायवेवर वाहतूक विभागाचे पोलीस तसेच कोलाड पोलीस ठाण्याकडील १५ पोलीस अंमलदार वाहतूक कोंडी निर्माण होऊ नये याची दक्षता घेत ही पथक विविध ठिकाणी कार्यरत होती.

## वशेणी इतिहास संपादकीय मंडळाचा वर्धापन दिन

**| उरण | प्रतिनिधी |**

जनसेवेतून आनंद देणाऱ्या उरण तालुक्यातील वशेणी गावात कार्यरत असणाऱ्या वशेणी इतिहास संपादकीय मंडळाचा सातवा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात पार पडला. या दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

छोट्याछोट्या उपक्रमातून जनसेवेचे मूल्य जपणारे वशेणी इतिहास संपादकीय मंडळ म्हणजे देशाची सेवा करणारे मंडळ आहे, असे गौरवोदगार साहित्यिक व इतिहास अभ्यासक मोरेश्वर बागडे यावेळी यांनी व्यक्त केले.



तसेच, या वर्धापन दिनानिमित्त वशेणी व उरण तालुक्यातील आपापल्या परीने विविध क्षेत्रात जनसेवा करणाऱ्या दहा व्यक्तींना मंडळाकडून जनसेवा पुरस्कार प्रदान करून त्यांना सन्मानित करण्यात आले.

यात जान्हवी जितेश कडू, नागनाथ कुठार, नागेश पोशा पाटील, संदीप रामदास पाटील, शशिकांत सहदेव ठाकूर, आम्रपाली कमलाकर पाटील, बळीराम चांगदेव म्हात्रे, टिळक नामदेव पाटील, लिलाबाई जरासंध म्हात्रे, भरत लक्ष्मण पाटील यांचा समावेश आहे.

तसेच, या वर्धापन दिनाचे औचित्य साधून शाळेतील मुलांना स्कूल बॅग वाटपदेखील करण्यात आले.

## विद्यार्थ्यांनी बनवल्या शाडू मातीच्या गणेशमूर्ती

### ●पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी प्रशिक्षण, प्रबोधन

**| पाली | प्रतिनिधी |**

पाली नगरपंचायत व इनरव्हील क्लब खोपोली यांच्या वतीने शाडूच्या मातीपासून गणेशमूर्ती बनविण्याचे विशेष प्रशिक्षण शिबीर टॉपवर्थ इंग्लिश मिडीअम स्कूल पाली येथे आयोजित करण्यात आले होते. माझी वसुंधरा अभियानाच्या उपक्रमांतर्गत पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी हा उपक्रम घेण्यात आला.

यावेळी तज्ञ मार्गदर्शकांनी शाडू मातीचे महत्व, मूर्ती बनवण्याच्या सोप्या तंत्रांसोबत रंगकामासाठी पर्यावरणपूरक उपाय याविषयी सविस्तर माहिती दिली.



यावेळी इनरव्हील क्लब खोपोली यांच्या वतीने कचरा नियोजन आणि पर्यावरण संवर्धन याबाबत पथनाट्य सादरीकरण करण्यात आले. तसेच शालेय आवारात वृक्षारोपण करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासाठी पुस्तके वाटप करण्यात आली.

मुख्याधिकारी आणि पर्यावरण विभागाच्या अधिकाऱ्यांनी उपस्थितांना संबोधित करताना, प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तीमुळे होणाऱ्या जलप्रदूषणाचे दुष्परिणाम व शाडू मातीच्या मूर्तीचा पर्यावरणपूरक लाभ स्पष्ट केला. या उपक्रमामुळे गणेशोत्सव साजरा करताना निसर्ग संवर्धनाची जाणीव नागरिकांमध्ये रुजविण्यास मदत होणार असल्याचे मत आयोजकांनी व्यक्त केले. तसेच, पाली नगरपंचायत हद्दीतील नागरिकांना पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहनही करण्यात आले.

## कर्जत तालुक्यात गणेशोत्सवाची धूम

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील गणेशोत्सवाची धूम सुरू असून तालुक्यात तब्बल १०४३६ गणेश मूर्ती विराजमान झाल्या आहेत. बाप्पांचे आगमन झाल्याने घरोघरी आरत्यांचा आवाज घुमू लागला आहे. मोदकाचा प्रसाद आणि विजेची रोषणाई भक्तांना प्रसन्न करीत आहे.

गणेशोत्सव सोहळा अगदी निर्विघ्न पार पडावा, यासाठी पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला आहे. त्यात कर्जत, नेरळ आणि माथेरान येथील पोलीस ठाण्याचा स्टाफ आणि सोबतीला होमगार्ड तसेच जिल्हा पोलीस दलाचे अतिरिक्त पोलीस यांची मदत मिळणार आहे. तसेच दंगल विरोधी पथकाची एक तुकडीदेखील तैनात राहणार आहे. पोलीस उप अधिक्षक राहुल पाटील, कर्जत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप भोसले, नेरळ पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक शिवाजी ढवळे आणि माथेरान पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक अनिल सोनोने यांच्याकडून कायदा सुव्यवस्था ठेवण्याचे नियोजन असणार आहे.



**१०४३६ बाप्पांचे आगमन**

## शक्ती-तुरा नाचांच्या सामन्यांचे आयोजन

**माणगाव** : माणगाव तालुक्यातील प्रसिद्ध उद्योजक तथा युवकांचे प्रेरणास्थान मंगेश पोळेकर यांनी गणेशोत्सवानिमित्त शुक्रवारी (दि.२९) नायक मराठा हॉल निजामपूर येथे शक्ती-तुरा नाचांचे जंगी सामने आयोजित केले आहेत. तरी या नाचांच्या सामनांचा नाचप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मनमुराद आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजक मंगेश पोळेकर यांनी करून सर्व गणेशभक्तांना गणपती सणानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. या कार्यक्रमाची जोरदार तयारी मंगेश पोळेकर व सहकाऱ्यांनी केली आहे.

## महाडमध्ये पर्यावरण परिषद उत्साहात

**| महाड | प्रतिनिधी |**

रोटरी क्लब ऑफ रायगड फोर्ट यांनी रोटरी क्लब ऑफ गोरेगाव, रोटरी क्लब ऑफ रोहा आणि रोटरी क्लब ऑफ कळंबोली यांच्या संयुक्त विद्यमाने डिस्ट्रिक्ट एन्व्हायरमेंट झोनल लर्निंग असेंबली अर्थात पर्यावरण परिषदेचे सुसूत्र आयोजन सेंट झेवियर्स स्कूल शिरगाव ता. महाड येथे करण्यात आले होते.

या पर्यावरण परिषदेत परिसंवादात रोटेरियन गौरी जोशी, रोटेरियन सत्यनारायण काब्रा, रोटेरियन सौरभ सोमानी, रोटेरियन सुनीता शिरगुप्पी व रिटेरियन अपूर्वा देसाई यांनी दहा वर्टीकल्स विषयी सविस्तर मार्गदर्शन केले व उपस्थित रोटेरियन्सशी संवाद साधला. पर्यावरण रक्षणासाठी विविध राबवले जात असणारे प्रभावी उपक्रम व त्यांच्या अंमल बजावणी याबाबत उपस्थितांशी सुसंवाद घडवून आणला.



या कार्यक्रमात पर्यावरणाच्या संवर्धनात महान कार्य करणारे गिधाड संवर्धनासाठी जागतिक पातळीवर ख्याती मिळवणारे प्रेम सागर मेस्त्री, जंगल संवर्धनासाठी वणवा विरोधी मोहिमेचे नेतृत्व करणारे किशोर रुक्मिणी विठोबा पवार व पर्यावरण संवर्धनाकरता विविध उपक्रमात स्वतःला समर्पित भावनेने कार्य करणाऱ्या अग्रेसर नेतृत्व ममता मेहता या पर्यावरणप्रेमींचा सन्मानपत्र देऊन रोटरी क्लब रायगड फोर्ट कडून विशेष सन्मान करण्यात आला. तसेच शालेय विद्यार्थ्यांकरिता पर्यावरण विषयक बॅनर व पोस्टर स्पर्धेचे आयोजनही करण्यात आले होते.

## स्मृती स्मारकास श्रीलंकेतील बौद्ध भंतेजींची ऐतिहासिक भेट

**| पाली/बेणसे | प्रतिनिधी |**

रायगड जिल्ह्यातील प्रथम बौद्ध भिक्खू, भंते संघकीर्ती महाथेरो यांच्या मूळ गावी उत्कर्षनगर (झाप) पाली, ता. सुधागड येथे त्यांच्या अनुयायानी श्रामनेर उपासक प्रचार संघाच्या माध्यमातून बौद्ध धम्म प्रचार आणि प्रसार करण्यासाठी प्रेरणा मिळावी आणि तथागताचा धम्म गतिमान करण्यासाठी भिक्खू संघास नियमित कार्यरत रहाण्यासाठी तसेच भिक्खू संघास सदस्य मिळावेत या हेतूने भंते संघकिर्ती यांचे हे स्मृतीस्थळ प्रेरणादायी ठरत आहे.



सुधागड तालुक्यात बौद्ध धम्म प्रचार करण्यासाठी सुधागड तालुका बौद्धजन पंचायत ही संस्था निर्माण करण्यासाठी त्यांचे अमूल्य योगदान राहिले आहे. त्यांची महती श्रीलंकेतील बौद्ध भंतेजीपर्यंत विश्वशांती बुद्ध विहार, अलिबागच्या माध्यमातून पोहचली. त्यामुळे भन्ते आनंद, महाथेरो, श्रीलंका, भन्ते अनिरुद्ध, थेरो, श्रीलंका, भन्ते आधीचित्तो कर्जत, भन्ते आर्यधम्म, श्रामनेर या भिक्खू संघाने झाप येथील भंते संघकीर्ती महाथेरो यांच्या स्मृती स्थळास ऐतिहासिक भेट दिली.

धम्म अनुयायी म्हणून आपणही धम्माचा प्रसार आणि प्रचार करण्याची जबाबदारी खांद्यावर घेतली पाहिजे व धम्म जगभरात प्रभावीपणे पोहचण्यासाठी तन, मन धनाने योगदान दिले पाहिजे, असे आवाहन भन्ते आनंद, महाथेरो यांनी यावेळी केले.

## सुधीर खैरे यांचा सन्मान

**कोलाड** : शासनाच्या आरोग्य सेवेचा लाभ आदिवासी वाड्यापासून गोरगरिबांपर्यंत मिळाव्या म्हणून सतत धडपडत असणाऱ्या व जनमानसात परिचित असणारे आरोग्यसेवक सुधीर गणपत खैरे यांच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेऊन १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाचे औचित साधून रातवड ग्रामपंचायतीने रायगड जिल्हा परिषद शाळा रातवड येथे शाल श्रीफळ व सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. खैरे यांचा गुणगौरव केल्याने परिसरात सुधीर खैरे यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

## बाप्पाचे जल्लोषात आगमन

### ● ७ हजार ४० घरगुती गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना

**| उरण | प्रतिनिधी |**

गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया...चा जयघोष करत उरण तालुक्यात गणरायाचे मोठ्या उत्साहात आगमन झाले. पावसाने विश्रांती घेतल्यावर विविध मूर्ती शाळांमधून लाडक्या बाप्पाला घरी आणण्यासाठी लोकांची एकच गर्दी झाली होती. साग्रसंगीत, विधीवत गणेशमूर्ती नेण्याची भाविकांमध्ये जणू चढाओढच निर्माण झाली होती. प्रत्येकांनी आपल्या घरी वाजत गाजत, मोठ्या भक्तिभावाने गणरायाची विधिपूर्वक पूजाअर्चा करून प्रतिष्ठापना केली.

उरण तालुक्यात ७ हजार ४० घरगुती गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली असून ६ सार्वजनिक मंडळांनी गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना मोठ्या भक्तिभावाने करण्यात आली. बाप्पांच्या स्वागताचा थाटमाट पाहता उरणकरांची बाप्पावर असलेली नितांत श्रद्धा, तसेच तोच खरा विघ्नहर्ता असल्याचा विश्वास बुधवारी ठायी-ठायी जाणवत होता.

## वाघ्रणच्या तंटामुक्त अध्यक्षपदी राजेंद्र पाटील

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

अलिबाग तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत वाघ्रणच्या महात्मा गांधी तंटामुक्त गाव समिती सन २०२५-२६ च्या अध्यक्षपदी सरपंच राजेंद्र हरिश्चंद्र पाटील, तर उपाध्यक्षपदी रायगड भूषण पत्रकार दिपक यशवंत पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. २५ ऑगस्त रोजी झालेल्या ग्रामसभेत समिती व पदाधिकारी निवड करण्यात आली. सरपंच हे पदसिद्ध अध्यक्ष असून पत्रकार दिपक पाटील हे सन २००७ तंटामुक्त गाव समिती स्थापनेपासून सलग १८ वर्षे सदस्य म्हणून कार्यरत आहेत.

तसेच, या समितीमध्ये उपसरपंच प्रदीप पाटील, ॲड



प्रफुल पाटील, प्रितम पाटील, ममता पाटील, सुवर्णा पाटील, संगिता म्हात्रे, दयानंद म्हात्रे, अजित सुप्रिया, पाटील मंगला ढवल, सोनल पाटील, अक्षदा पाटील, सारीका पाटील इत्यादींचा समावेश आहे.

आतापर्यंत झालेल्या समित्यांचे अनेक माजी सदस्यांनी सहकार्य केले असून असंख्य तंटे मिटवले आहेत. त्यामुळे या समितीला महत्व आहे.

## गणेशोत्सव कालावधीत घरोघरी गौरीपूजन करण्याची प्रथा | दीडशे वर्षे जुने स्वयंभू गणेश मंदिर

# खांदा गावातील 'दोन गाव एक गणपती' परंपरा

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल ग्रामीण (वा) तालुक्यातील धाकटा खांदा गावातील दीडशे वर्ष जुन्या स्वयंभू गणेश मंदिरात आजही दोन गाव एक गणपती प्रथा पाळली जात आहे. दोन गाव एक गणपती असलेले हे राज्यातील एकमेव ठिकाण आहे.

तालुक्यातील धाकटा खांदा आणि मोठा खांदा या गावात ही प्रथा पाळण्यात येत असून, गणेश उत्सव काळात गावातील कोणत्याही व्यक्तीने घरात गणेश मूर्तीची स्थापना केल्यास त्या कुटुंबातील व्यक्तींना विविध अडचणीचा सामना करावा लागत असल्याचा अनुभव काही ग्रामस्थांनी घेतला आहे. त्यामुळे दोन्ही ग्रामस्थांनी याठिकाणी दोन गाव एक गणपतीच्या परंपरेचा पायंडा पाडत गावातील दीडशे वर्ष जुन्या स्वयंभु श्री गणेश मंदिरातच गणेश उत्सव साजरा करण्याचा निर्णय घेतला. यामुळे गणेशोत्सवाच्या काळात दोन्ही गावचे ग्रामस्थ मंदिरात एकत्र येत भजन, कीर्तन, भारुड, आदीसह परंपरागत बाल्या नृत्याचे कार्यक्रमांचे आयोजन मंदिरात करीत असतात. तसेच, या काळात ग्रामस्थांनी स्थापन केलेल्या श्री गणपती देवस्थान ट्रस्टमार्फत ग्रामस्थांच्या भोजनाची व्यवस्था केली जाते. गणेशोत्सव काळात दोन्ही गावात गणेश स्थापना केली जात नाही. मात्र, या कालावधीत घरोघरी गौरीपूजन करण्याची परंपरादेखील गावकऱ्यांनी सांभाळली आहे.



### दुसऱ्या दिवशी काढली जाते मिरवणूक

दोन्ही गावातील ग्रामस्थ एकत्र येत गणेश चतुर्थीच्या दुसऱ्या दिवशी गावात मिरवणूक काढतात. गावात वाजतगाजत काढण्यात येणाऱ्या मिरवणुकीत दोन्ही गावातील ग्रामस्थ भक्तीभावाने सामील होत उत्सवाचा समारोप करतात.

### मंदिरात इतरही देवतांच्या मूर्ती

मंदिराबाबत सांगितल्या जाणाऱ्या अख्यायीकानुसार इंग्रज आमदानित देशात पसरलेल्या प्लेगमुळे भयभीत झालेल्या खांदा गावातील ग्रामस्थांनी गावापासून काही अंतरावर असलेल्या जंगलात नवीन गावं वसवण्याचा निर्णय घेतला. याकरिता केल्या जात असलेल्या सफासफाई दरम्यान ग्रामस्थांना त्या ठिकाणी डाव्या सोंडेच्या गणेश मूर्तीसोबत भवानी माता, श्री वेताळेश्वर महाराज, श्री वाघेश्वर महाराज, नंदी आदी पुरातन मूर्ती सापडल्याने ग्रामस्थांनी त्या ठिकाणी छोटेखानी मंदिर निर्माण केले. १९९२मध्ये मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आला आहे.

# पुनर्वसनाचा प्रस्ताव केंद्राकडे धूळखात

## ।। उच्च न्यायालयात याचिका दाखल ।। पुढील सुनावणी ४ सप्टेंबरला

**| उरण | प्रतिनिधी |**

जुना शेवा कोळीवाडा गावातील ग्रामस्थांनी जेएनपीटी या महत्वाच्या प्रकल्पासाठी आपल्या जमिनी कवडीमोल भावाने विकल्या. जमीन संपादन करताना स्थानिक भूमीपुत्रांना नोकरीत प्राधान्य, पुनर्वसन, विविध मूलभूत सेवा-सुविधा पुरविण्याची हमी जेएनपीए प्रशासनाने दिली होती. मात्र, ही हमी हवेतच विरली आहे. कारण उरण तालुक्यातील जुना शेवा कोळीवाड्यातील २५६ शेतकरी/बिगर शेतकरी कुटुंबांना गेली ४० वर्षे बोरीपाखाडी येथे ९१ गुंठे जमिनीत तात्पुरते संक्रमण शिबिरात ठेवण्यात आले आहे. मात्र, कायमस्वरूपी पुनर्वसन केले नाही. त्यामुळे जुना शेवा कोळीवाडा (हनुमान कोळीवाडा) विस्थापितांना वेळोवेळी अनेकदा केंद्र व राज्य सरकार विरोधात आंदोलने करावी लागली होती. परंतु, राज्य व केंद्र सरकारने कोणतेही दखल घेतली नाही. त्यामुळे गेल्या ४० वर्षांपासून २५६ कुटुंब आजही पुनर्वसनापासून वंचित आहेत. त्यामुळे सर्वांनी एकत्र येत मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्याचा निर्णय घेतला आहे.



### विस्थापितांमध्ये संतापाचे वातावरण

**गेल्या ४० वर्षांपासून जेएनपीटी प्रशासन, केंद्रीय मंत्रालय व रायगड प्रशासन विस्थापितांची सातत्याने दिशाभूल करत आहेत, तरीही आजतागायत कोणताही निर्णायक निर्णय घेण्यात आलेला नाही. त्यामुळेच न्यायासाठी उच्च न्यायालयात धाव घ्यावी लागल्याची प्रतिक्रिया महाराष्ट्र स्मॉल स्केल ट्रेडिशनल फिशवर्कर्स युनियनचे अध्यक्ष नंदकुमार पवार यांनी सुनावणीनंतर दिली. केंद्र आणि राज्य सरकारने जुना शेवा कोळीवाडा ग्रामस्थांना वेळोवेळी पुनर्वसन करण्याचे व इतर महत्वाच्या मागण्या मान्य करण्याचे आश्वासन दिले. मात्र, ते आश्वासन कधीही पूर्ण केले नसल्याने आता जुना शेवा कोळीवाडा विस्थापीतांमध्ये संतापाचे वातावरण पसरले आहे.**

२०२३ मध्ये जेएनपीएने केंद्रीय शिपिंग, वॉटर व पोर्ट मंत्रालयाकडे पाठविलेल्या शेवा कोळीवाडा गावाच्या पुनर्वसनाच्या प्रस्तावाला अद्याप मंजुरी मिळालेली नाही. त्यामुळे केंद्र सरकारविरोधात विस्थापीतामध्ये संतापाची लाट उसळली आहे. गेल्या ४० वर्षांपासून गावातील २५६ कुटुंबीय पुनर्वसनाच्या प्रतिक्षेत आहेत. त्यांचा सरकारविरोधात संघर्ष सुरू आहे. मात्र, संघर्षानंतरही विस्थापीताना न्याय मिळालेला नाही. त्याचबरोबर इतर मागण्याही प्रलंबित आहेत. त्यामुळे विस्थापीतांनी महाराष्ट्र स्मॉल स्केल ट्रेडिशनल फिश वर्कर्स युनियनच्या माध्यमातून उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. या याचिकेवर शुक्रवारी (दि.२२) उच्च न्यायालयात सुनावणी झाली. याचिका कर्त्यांच्यावतीने ॲड. रशीद खान व ॲड. सिद्धार्थ इंगळे यांनी बाजू मांडली. यावेळी केंद्र व जेएनपीए प्रशासनाची बाजू मांडताना ॲड. डी.पी. सिंग व अमित पाटील यांनी सांगितले की, २०२३ मध्ये केंद्रीय शिपिंग, वॉटर व पोर्ट मंत्रालयाकडे विस्थापीतांच्या पुनर्वसनाचा प्रस्ताव पाठवण्यात आला आहे. त्यामुळे पुनर्वसनाला अद्याप मंजुरी मिळालेली नसून याप्रकरणी पाठपुरावा सुरू आहे. तसेच, याप्रकरणी अभ्यासासाठी आणखी काही दिवसांची मुदत देण्याची विनंती केली आहे. त्यानंतर उच्च न्यायालयाने पुढील सुनावणी ४ सप्टेंबर रोजी ठेवली आहे. त्यामुळे केंद्र सरकारच्या दिरंगाईमुळेच शेवा कोळीवाडा गावातील २५६ कुटुंबीयांचे पुनर्वसन रखडल्याची बाब शुक्रवारीसुनावणीदरम्यान निदर्शनास आली. त्यामुळे विस्थापितांमध्ये जेएनपीटी प्रशासनाविरोधात प्रचंड संतापाची लाट पसरली आहे. आता सर्वांच्या नजरा पुढील सुनावणीकडे लागल्या आहेत.

# जिल्हाधिकाऱ्यांचे प्रतिबंधात्मक आदेश

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

### भाड्याने राहणाऱ्यांची माहिती देणे बंधनकारक

रायगड जिल्ह्याची लोकसंख्या २६ लाखहून अधिक आहे. जिल्ह्यात २ हजारहून अधिक वेगवेगळे प्रकल्प कारखाने आहेत. तसेच, नव्याने कारखाने प्रकल्प येत आहेत. कामगार म्हणून वेगवेगळ्या राज्यातून नागरीक नोकरी, व्यवसायासाठी जिल्ह्यात येत आहेत. त्यांना राहण्यासाठी घर, फ्लॅट अथवा फार्म हाऊस दिला जातो. मात्र, त्याची माहिती स्थानिक पोलिसांना दिली जात नाही. त्यामुळे काही अनुचित प्रकार घडल्यास त्याची माहिती देखील पोलिसांना मिळत नाही. त्यामुळे नागरी सुरक्षेच्या दृष्टीने रायगड पोलिसांनी पाऊल उचलले आहे.

पोलीस अधीक्षकांच्या अहवालानुसार, जिल्ह्यातील औद्योगिक वसाहती, फार्म हाऊस व शहरी भागात मोठ्या प्रमाणावर परप्रांतीय नागरिक नोकरी, व्यवसाय किंवा इतर कारणास्तव राहण्यासाठी घरे व फ्लॅट भाड्याने घेत आहेत. परंतु, याबाबत मालकांकडून स्थानिक पोलीस ठाण्यात वेळेवर माहिती दिली जात नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे गुन्हेगारी किंवा दहशतवादी कारवाया घडल्यास तपासातअडथळे निर्माण होतात. यापूर्वीही रायगड परिसरातून भाडेकरू म्हणून राहणाऱ्या नक्षलवाद्यांना अटक झाल्याच्या घटना घडल्या आहेत. तसेच, बांगलादेशींनादेखील ताब्यात घेण्यात आले होते. भविष्यात घातपाती कारवायांना प्रतिबंध घालण्यासाठी प्रत्येक भाडेकरू किंवा खरेदीदाराची माहिती पोलीस स्टेशनकडे असणे अत्यावश्यक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

नवीन आदेशानुसार, मालमत्ता धारकांनी भाडेकरू अथवा खरेदीदार यांची आवश्यक माहिती भाडेकरार किंवा विक्री झाल्यानंतर ७ दिवसांच्या आत संबंधित पोलीस ठाण्यात देणे बंधनकारक असेल. आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधितांविरुद्ध दंडनीय कारवाई होणार आहे. हा आदेश २६ ऑगस्टपासून पुढील दोन महिन्यांपर्यंत लागू राहणार आहे. नागरिकांनी स्वतःच्या सुरक्षिततेसाठी व कायद्याच्या अधीन राहून आवश्यक ती माहिती पोलीस ठाण्यात नोंदवावी, असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले आहे.

# एसटीच्या धडकेने बैल जखमी

## अलिबाग आगाराचे शेतकऱ्याकडे दुर्लक्ष



**| अलिबाग | प्रतिनिधी |**

अलिबाग आगारातील एसटी बसची धडक लागून बैल जखमी झाल्याची घटना गुरूवारी (दि.२१) घडली आहे. चालकाच्या दुर्लक्षपणामुळेच अपघात होऊन बैलाला गंभीर दुखापत झाल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे उपचारासाठी शेतकऱ्याला आर्थिक भूर्दंड बसला आहे. ही घटना घडून आठ दिवस उलटून गेले, तरीदेखील अलिबाग एसटी बस आगारातील प्रशासनाने कोणतीही दखल घेतली नसल्याची प्रतिक्रीया उमटत आहे.

अलिबाग तालुक्यातील रामराज येथील शेतकऱ्याचा बैल गुरुवारी सकाळच्या सुमारास रस्त्याजवळ उभा होता. दरम्यान, रामराजहून अलिबागकडे जाणाऱ्या एसटीची जोरदार धडक त्या बैलाला लागली. या धडकेत बैलाला गंभीर दुखापत झाली असून त्याच्या पायाला गंभीर इजा झाली आहे. याबाबत शेतकऱ्यांनी एसटी चालकाला जाब विचारला असता, त्या चालकानेच वरचढ होत शेतकऱ्याला दाबण्याचा प्रयत्न केला. या प्रकारामुळे सर्वसामान्य शेतकऱ्यांकडून नाराजीचे सुर उमटत आहेत. ही घटना घडून आठ दिवस उलटून गेले आहेत. या शेतकऱ्यावर उपचाराचा आर्थिक भुर्दंड बसत आहे. तो बैल खाण्याच्या परिस्थितीतदेखील नसल्याची माहिती शेतकऱ्याकडून उपलब्ध झाली आहे. त्यामुळे अलिबाग एसटी बस आगार प्रशासन काय भुमिका घेणार, याकडे लक्ष लागून राहिले आहे. तसेच, लवकरात लवकर नुकसानभरपाई व्हावी, अशी मागणी पीडित शेतकऱ्याकडून होत आहे.

# उरण तालुका बॅनरच्या विळख्यात

**| उरण| प्रतिनिधी |**

उरण तालुका सध्या बॅनरच्या विळख्यात सापडला आहे. येथील नाक्या नाक्यावर, मिळेल त्या ठिकाणी बॅनर लावून शोबाजी केली जात आहे. त्यामुळे तालुक्यातील महत्वाच्या ठिकाणांचे विद्रुपिकारण झाल्याचे पहायला मिळत आहे. तसेच, एखादे चांगले काम करण्याच्या नादात पोलिसच चूक करत असल्याचे देखील समोर येत असून त्याचा त्रास नागरिकांना भोगावा लागतो. याची प्रचिती उरणच्या चार फाट्यावरील सर्कलवर येत आहे. पोलिसांनी उरण तालुका मराठी पत्रकार संघाच्या दिशादर्शक फलकावरच बॅनर लावून जनजागृती केली आहे.



सार्वजनिक ठिकाणी बॅनर लावण्यासाठी नगरपरिषद व ग्रामपंचायातीची परवानगी घ्यावी लागते. असे न केल्यास बॅनर आणि बॅनर लावणाऱ्यांवर कारवाई केली जाऊ शकते. मात्र, सध्या तालुक्यात या नियमांना बगल देऊन मिळेल त्या जागेवर बॅनर लावून शोबाजी केली जात आहे. गणेशोत्सवाच्या या काळात असे बॅनर ठिकठिकाणी पहायला मिळत आहेत. त्यामुळे शहर आणि तालुक्यातील महत्वाच्या ठिकाणांचे विद्रुपीकरण झाले आहे. याउलट नगरपरिषद आणि ग्रामपंचायात या विद्रुपीकरणाकडे उघड्या डोळ्यांनी दुर्लक्ष करत आहेत. महत्वाचे म्हणजे यामध्ये पोलीस यंत्रणेकडूनही नियमांचे उल्लंघन होताना दिसत आहे.

उरण पोलिसांनी 'नशामुक्त उरण' हा स्तुत्य उपक्रम हाती घेतला आहे. त्यासाठी निरनिराळे उपाय देखील त्यांच्याकडून करण्यात येत आहेत. याचाच एक भाग म्हणून पोलिसांच्यावातीने तालुक्यातील महत्वाच्या ठिकाणी बॅनरस्वरूपात जनजागृती करण्यात येत आहे. मात्र, हे बॅनर चारफाटा येथील सर्कल येथील तालुका मराठी पत्रकार संघाने लावलेल्या दिशादर्शक फालकावरच लावण्यात आले आहे. यामुळे येथे नव्याने येणाऱ्या नागरिकांना दिशेबाबत संभ्रम निर्माण होत आहे.

# रायगड पोलिसांच्या ताफ्यात अत्याधुनिक फॉरेन्सिक व्हॅन

**| रेवदंडा | प्रतिनिधी |**



भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ लागू झाल्यानंतर गुन्हे तपास प्रक्रियेत तांत्रिक अचूकता आणण्यासाठी शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. त्याअंतर्गत रायगड जिल्हा पोलीस ताफ्यात अत्याधुनिक फॉरेन्सिक व्हॅन दाखल झाली असून, जिल्ह्यातील तपास यंत्रणेला आधुनिक तंत्रज्ञानाची नवी ताकद मिळाली आहे. या अत्याधुनिक व्हॅनमध्ये भौतिक, रासायनिक, जैविक तसेच डिजिटल पुरावे गोळा करण्यासाठी लागणारी अत्याधुनिक साधनसामग्री (किट्स) बसविण्यात आली आहे. त्यासाठी विशेष प्रशिक्षित मनुष्यबळ नेमले असून, त्यात ०४ असिस्टंट केमिकल अनालायझर, ०२ सायंटिफिक असिस्टंट आणि वाहन चालकाचा समावेश आहे. त्यामुळे ही व्हॅन गंभीर गुन्ह्यांच्या तपासात घटनास्थळीच ठोस व शास्त्रशुद्ध पुरावे गोळा करण्याचे काम करणार आहे. हे पुरावे न्यायालयात सादर करून आरोपींना शिक्षा होण्याची प्रक्रिया अधिक वेगवान व खात्रीशीर होईल. परिणामी, निर्दोषांना दिलासा तर गुन्हेगारांना शिक्षा असे न्यायाचे तत्त्व अधिक प्रभावीपणे लागू होईल.



● चिरनेर येथील पी.पी.खारपाटील कन्ट्रक्शन अँड कंपनीचे सहव्यवस्थापक राजेंद्र खारपाटील आपल्या पारस निवासस्थानात विराजमान झालेल्या लाडक्या बाप्पाचे आपल्या कुटुंबासह मनोभावे दर्शन घेताना दिसत आहे. (छाया : काव्य म्हात्रे)



● उरणचे निवडणूक नायब तहसीलदार प्रभाकर पद्माकर नवाळे यांच्या विंधणे येथील निवासस्थानात विराजमान करण्यात आलेली गणरायाची सुंदर सुबक मुर्ती. (छाया- काव्य म्हात्रे)

**महाड-पनवेलसाठी अधिक गाड्या** जवळपास १०० बसेस आगारातून धावणार

# परतीच्या प्रवासाला महाड आगार सज्ज

**| महाड | प्रतिनिधी |**

गणेशोत्सवासाठी मोठ्या प्रमाणात शहरवासीय कोकणात दाखल झाले आहेत. ज्या पद्धतीने गणेश भक्तांना कोकणात आणण्यासाठी महाड एस.टी. महामंडळाच्या आगाराने सुविधा निर्माण करून दिली होती त्याचप्रमाणे परतीच्या प्रवासाला देखील महाड आगार सज्ज झाले आहे. महाडपासून पनवेलपर्यंत महाड आगाराकडून जादा गाड्या सोडण्यात येणार आहेत, अशी माहिती महाड आगार प्रमुख रितेश फुलपगारे यांनी दिली.



गणेश उत्सवाला बुधवार दि.२७ ऑगस्टपासून मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला आहे. शहरवासीय एसटीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात गावी आले आहेत. त्यामुळे दीड दिवसीय आणि पाच दिवसांच्या गणेशाचे विसर्जन केल्यानंतर परतीच्या प्रवासाला मोठ्या प्रमाणात गर्दी होते. अनेकांना हा प्रवास मोठा त्रासदायक होतो. एसटी बरोबरच खासगी वाहने देखील मिळत नसल्याने प्रवाशांना दिवसभर वाहनाची वाट पहावी लागते. मात्र, गेल्या काही वर्षांपासून एसटी महामंडळाकडून चांगल्या प्रकारे नियोजन केले जात आहे. राज्यभरातील एस.टी.च्या गाड्या कोकणात अधिक प्रमाणात मागवल्या जातात. महाड आगाराने देखील अशाच पद्धतीने नियोजन केले असून गणेशभक्तांच्या परतीच्या प्रवासाला एसटी सज्ज झाली आहे. महाडमधून मुंबई, नालासोपारा, परळ, ठाणे, बोरिवली, उरण, कल्याण, पुणे अशा विविध ठिकाणी जादा एसटी बसेसची सुविधा निर्माण केली आहे. महाड आगाराकडून जवळपास १०० बसेस या मार्गावरून धावणार आहेत. तसेच, महाडपासून पनवेलपर्यंत जाण्याकरता महाड एसटी आगाराने जवळपास ५० ते ६० बसेस तयार ठेवल्या आहेत.

तसेच, महाड आगारातून ग्रुप बुकिंग करण्यासाठी व अन्य सुविधां करिता आगार प्रमुख रितेश फुलपगारे, सहाय्यक वाहतूक निरीक्षक अमोल खाडे, स्थानक प्रमुख उदय हाटे, निरीक्षक तुषार हाटे, कार्यशाळा प्रमुख डावरे, लिपिक चिनके यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन एसटी प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

> शहरातून आलेल्या गणेश भक्तांच्या सुविधेसाठी गाड्या आणि चालक-वाहक गुंतले असल्याने ग्रामीण भागातील फेऱ्यांवर थोडा फरक पडणार आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील प्रवाशांनी या होणाऱ्या गैरसोयीबाबत सहकार्य करावे.
> – रितेश फुलपगारे,
> आगार प्रमुख, महाड

### आगारातच प्रवासी वाहतूक केंद्र

**महाड आगारातच प्रवासी वाहतूक केंद्र उभे करून याच ठिकाणी बुकिंग करून महाड-पनवेल करीता बसेस धावणार आहेत. महाड-पनवेल बसेसमुळे मुंबईसह अन्य ठिकाणी जाणाऱ्या गणेश भक्तांचा प्रवास सुखकर होणार आहे. गणेशोत्सवाकरिता शहरातून गावी आलेल्या गणेश भक्तांना ग्रुप बुकिंग देखील करता येणार आहे. ग्रुप बुकिंगमुळे एसटी बस थेट त्यांच्या गावातून सुटणार आहे. त्यामुळे या सुविधेचा देखील लाभ घेणे फायदेशीर ठरणार आहे.**

## निवडक

### ग्रामसभेत भ्रष्टाचाराची लक्तरे वेशीवर

**उरण:** तालुक्यातील ग्रामसभांनी गावोगावातील सत्ताधाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेत जनतेने भ्रष्टाचाराचे धिंडवडे काढत सरपंच, सदस्य व ग्रामसेवकांची बोलतीच बंद केली आहे.गावाच्या तिजोरीतून विकासकामांच्या नावाखाली लाखोंचा निधी हडप करून आपली खिसेपुर्ती करणाऱ्या सत्ताधाऱ्यांना ग्रामस्थांनी जनसभा रंगताच जाब विचारला. 'कागदावर विकास, प्रत्यक्षात हडपशाही' हा प्रकार उघड करत ग्रामस्थांनी सत्ताधाऱ्यांचा पर्दाफाश केला आहे. सरपंच-ग्रामसेवक संगनमताने कधीही कुठल्याही पेपरात निविदा काढल्याशिवाय ठेकेदारांना कामे वाटली जात असल्याचा आरोप देखील ग्रामस्थांनी केला आहे. एवढेच नव्हे तर काम काहीच नाही पण कागदावर कोट्यवधींचा खर्च दाखवून पैसे वाटून घेण्याचा भ्रष्टाचार उघड झाला आहे. यापेक्षाही धक्कादायक म्हणजे, तालुक्यातील एका ग्रामपंचायतीत सरपंचांनी कोणतीही निविदा न काढता एका ठेकेदाराला थेट काम देण्याचे आदेश दिले. त्या ठेकेदाराने काम पूर्ण केले तरी त्याचे लाखों रुपयांचे बिल अद्याप थकवले आहे. परिणामी संतप्त ठेकेदाराने ग्रामपंचायतीला लेखी पत्र देऊन कामाचा ठराव घ्या, माझे बिल द्या, अन्यथा पोलिसांत तक्रार करू अशी थेट धमकी दिली आहे. या घटनेमुळे ग्रामपंचायतींचा भ्रष्ट कारभार उघडकीस येऊन तालुक्यात नाक्यांनाक्यावर चर्चा रंगली आहे.



### उरणकरांना खड्ड्यांचा दणका

**उरण:** तालुक्यात प्रशासनाचे गांधीजींच्या तीन माकडांसारखे झाले आहे. त्यांना येथील समस्या ऐकायला येत नाही, ना ते बघत आहेत आणि त्यावर काही बोलतही नाहीत. अशी स्थिती तालुक्यात असल्यामुळे तालुक्यातील छोट्या-मोठ्या प्रश्नांसाठी सामान्य माणसांना आवाज उठविण्याची वेळ येऊन ठेपत आहे. अशातच उरण-पनवेल रस्त्यावरील फुंडे पुलावरून उत्तरेच्या बाजूला उतरताना भला मोठा खड्डा पडला आहे. या खड्ड्यातून विशेषत: मोटार सायकलस्वार नेहमीच अपघातग्रस्त होत असतात. त्यामुळे सिडको आणि सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अधिकारी वर्गाला एवढा मोठा खड्डा दिसत कसा नाही असा, प्रश्न प्रवासी वर्गाला पडला आहे. उरण तालुक्यातील रस्ते हे यंदाच्या गणेशोत्सवात सर्वाधिक चर्चेत राहिले आहेत. रस्त्यांवरील खड्डे भरणी असू द्या किंवा खराब रस्ते दुरूस्ती करणे असो, त्यासाठी नागरिकांना आंदोलनात्मक पवित्राच घ्यावा लागला आहे. अशा आंदोलनांची राजकीय नेते मंडळींनी हाक दिल्यावरच यंत्रणा ठिकठिकाणी जागी झाल्याची उदाहरणे तालुक्यातील नागरिकांनी अनुभवली आहेत. सध्या नवघर सर्कल ते फुंडे हायस्कूल या मार्गावरील फुंडे कडील उतरणीवर एक भला मोठा खड्डा पडला आहे. मात्र, त्या खड्ड्याकडे अजूनही लोकप्रतिनिधी आणि शासकीय अधिकारी वर्गाचे लक्ष गेलेले दिसत नाही. त्यामुळे ऐन गणेशोत्सवात नागरिकांना मात्र या खड्ड्यांचा दणका सहन करूनच आपला पुढचा प्रवास करावा लागत आहे. त्यामुळेच अधिकारी लोकांना हा खड्डा नक्की कधी दिसणार, हा प्रश्न पडला आहे.

### तरूणांकडून रस्त्यांची डागडुजी

**पाली/वाघोशी :** पाली-खोपोली महामार्गावरील खड्ड्यांचे साम्राज्य पाहून गणेशभक्त व प्रवाशांचा संताप उसळला आहे. वारंवार तक्रारी करूनही एमएसआरडीसी प्रशासन व कंत्राटदारांनी याकडे कानाडोळाच केला आहे. त्यासाठी निधी खर्च होतो, कामे दाखवली जातात; परंतु, प्रत्यक्षात रस्त्यावर खड्ड्यांचे जाळे कायम असल्याचे चित्र आहे. प्रशासनाच्या या निष्क्रियतेला कंटाळून राबगाव गावातील नवतरुणांनी थेट रस्त्यावर उतरून खड्डे बुजवले आहेत. या युवकांनी प्रशासनाच्या बेपर्वाईवर झणझणीत अंजन घालत स्वतःच्या मेहनतीने रस्त्यांची डागडुजी केली आहे. दिलदोस्ती ग्रुपच्या सोहम जाधव, प्रणव सानप, तेजस टिकवणे, प्रणित सानप, सार्थक जाधव, तनिष सानप, अनुज मोहिते, प्रवीण घायले व प्रेम टिकोणे या युवकांनी रस्त्यांची डागडुजी केली. खड्डे बुजवून झाल्यानंतर या तरुणांनी गणरायाच्या चरणी हात जोडून 'आता तरी शासनाने जागे व्हावे व कायमस्वरूपी रस्त्यांची दुरुस्ती व्हावी' अशी प्रार्थना केली. तसेच, कोट्यवधींचा निधी मंजूर होऊनही रस्ते आम्हाला बुजवावे लागत असतील, तर मग स्थानिक नेते आणि कंत्राटदारांची गरज तरी काय, असा थेट सवाल युवकांनी प्रशासनाला विचारला आहे.



## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● **जन्नावार हॉस्पिटल अलिबाग मध्ये** कामासाठी मावशी व नर्सची जागा आहे. (Vacancy) Contact No 7798034509

● **मालाडे, अलिबाग-रोहा या रस्त्यालगत** (१५ एकर) ६०० गुंठे शेत जमीन रुपये तीन लाख गुंठा या दराने विकणे आहे. (गट क्रमांक १२४ लगत) सचिन : ९८२२२५७९२९, ९३५९५२८७२२

● **श्रीगाव, अलिबाग येथे शेत जमीन** २३० गुंठे, रुपये ४ लाख गुंठा या दराने विकणे आहे. (गट क्रमांक २७७ लगत) सचिन : ९८२२२५७९२९, ९३५९५२८७२२

● **वरसोली, अलिबाग येथे शहरालगत** १०० गुंठे शेत जमीन रुपये २० लाख गुंठा या दराने विकणे आहे. (गट क्रमांक १७३ लगत)सचिन : ९८२२२५७९२९, ९३५९५२८७२२

● PHARMACIST REQUIRED अलिबागमध्ये कामाला फार्मसिस्ट पाहिजे.अधिक माहितीसाठी संपर्क करा-९३७०६५३०५८.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# पालिका क्षेत्रात भावपूर्ण वातावरणात गणरायांना निरोप

**| पनेवल | वार्ताहर |**

महापालिका क्षेत्रातील कळंबोली, कामोठे, पनवेल, खारघर या चारही प्रभागात सुमारे ५६० पेक्षा अधिक (संध्याकाळी साडेसहापर्यंत) दीड दिवसाच्या घरगुती गणपतींचे भक्तीमय वातावरणात नियोजनबध्दरित्या शांततेत विसर्जन करण्यात आले.

माझी वसुंधरा ६.० अंतर्गत स्वच्छ, सुंदर आणि प्रदूषणमुक्त पनवेलसाठी पनवेल महानगरपालिका विविध उपक्रम राबवित आहे. या अंतर्गतच सणांचं पावित्र्य आणि पर्यावरणाचे भान राखले जावे यासाठी आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी 'उत्सव गणरायाचा जागर पर्यावरणाचा' ही मोहिम हाती घेतली आहे. गणेशभक्तांच्या सोयी – सुविधांसाठी पालिकेच्या बांधकाम विभाग, आरोग्य विभाग, विद्युत विभाग, परवाना विभाग, भांडार विभाग, वाहन विभाग व वैद्यकीय विभाग,पर्यावरण विभाग या ८ विभागांच्या माध्यमातून समन्वय साधून विसर्जन घाटांवरती संपूर्ण तयारी करण्यात आली होती. याकामी विविध एनजीओ, सामाजिक संघटनादेखील महापालिकेस सहकार्य करत आहेत.यावर्षी महापालिकेच्या बांधकाम विभागाच्या वतीने एकुण १३४ ठिकाणी विसर्जनाची सोय करण्यात आली आहे. यामध्ये ५८ ठिकाणी नैसर्गिक विर्सजन ठिकाणे असून ७६ ठिकाणी कृत्रिम तलावांची विसर्जनासाठी सोय करण्यात आली आहे.

# पालीत दीड दिवसांच्या बाप्पाला भक्तीपूर्ण वातावरणात निरोप

**पाली/बेणसे** : महाराष्ट्रातील प्रसिद्ध अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या बल्लाळेश्वर पाली व सुधागडात गणेश उत्सवात अत्यंत प्रसन्न, मंगलमय असे धार्मिक वातावरण पहावयास मिळते. गणरायाचं आगमन व विसर्जन यावेळी गणेशभक्त भावुक होताना दिसतात. पाली सुधागडात दीड दिवसांच्या बाप्पाचे दि. (२८) गुरुवारी दुपारनंतर भक्तीपूर्ण वातावरणात पाली अंबा नदी तसेच पारंपरिक विसर्जन स्थळी विसर्जन करण्यात आले. यावेळी 'गणपत्ती बाप्पा मोरया,पुढच्या वर्षी लवकर या', 'मोरया रे बाप्पा मोरया रे' चा जयघोष निनादला. पाली सुधागड सह जिल्ह्यात परंपरेनुसार टाळ, मृदुंगाच्या गजरात दीड दिवसांच्या बाप्पाच्या मूर्तींचे विधीवत विसर्जन करण्यात आले. सध्या गावोगावी तसेच शहरी भागात गणेशोत्सवानिमित्त वातावरण प्रफुल्लित झाले आहे. गणेशोत्सवानिमित्त विविध धार्मिक, सामाजिक, सेवाभावी व पर्यावरणपूरक तसेच प्रबोधन जनजागृतीपर विविधांगी कार्यक्रम राबविले जात आहेत. मुंबईकर व शहरातील कोकणवासी, पाहुण्यांनी बहरून गेली आहेत. सर्वत्रच बाप्पाच्या उत्सवाची चांगलीच धूम असल्याचे दिसून येत आहे. बुधवारी बाप्पा गणरायाचे आगमन झाले. त्यावेळी भक्तांनी विविध पारंपरिक वाद्यांसह नाचत गाजत बाप्पाला घरी आणले होते. दीड दिवसांचा पाहुणचार घेऊन बाप्पाचे विसर्जन करण्यात आले.

# उरणकरांनी गणरायाला दिला निरोप

**उरण** : गणपती बाप्पाचे आगमन बुधवारी (दि.२७)गणेशचतुर्थी दिवशी झाले. दीड दिवसाच्या मुक्कामानंतर गुरुवारी (दि.२८) रोजी भावपूर्ण,भक्ती भावाने गणपती बाप्पाला उरण शहरासह ग्रामीण भागात निरोप देण्यात आला. ग्रामीण भागात नदी, तलाव येथे विसर्जन करण्यात आले. उरण नगरपरिषदेच्यावतीने उरण नगरपरिषद मुख्याधिकारी समीर जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली उरण नगरपरिषदेचे विमला तलाव, भोवरा तलाव व मोरा जेट्टी येथे चांगली व्यवस्था करण्यात आली. प्रत्येक ठिकाणी कर्मचाऱ्यांची व्यवस्था करण्यात आली होती. जेणे करून नागरिकांना गणपती बाप्पाचे विसर्जन करताना कोणतीही गैरसोय होणार नाही, त्याकडे लक्ष दिले जात होते. उरण नगरपरिषदेच्या वतीने या वर्षापासून प्लास्टर ऑफ पॅरीसच्या गणपतीमूर्ती विसर्जन करण्यासाठी कृत्रिम तलावाची उभारणी केली होती त्यामध्ये पॅरीसच्या गणपतीमूर्ती विसर्जन करण्यात आल्या. शाडूच्या मातीपासून बनविल्या गणेशमूर्ती विमला तलावात विसर्जन करण्यात आल्या. या कामी उरण शहरातील देऊळवाडीतील गणपती विसर्जन मित्र मंडळ यांनी आलेल्या गणेशमूर्तींचे विसर्जनाचे काम व्यवस्थित केले.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविणेत येते की, विद्यमान जमीन मालक, श्री.पांडूरंग राघो पाटील यांच्या ताबेकब्जातील, वहीवाटीतील, त्यांच्या मालकी हक्कात असलेली खालील परिशिष्ठामध्ये वर्णन केलेली शेतजमीन आमचे अशिलांनी त्यांचेकडून कायम स्वरूपी खरेदी करणेचा व्यवहार ठरविला आहे. सदरहू शेतजमीनीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**शेतजमीन मिळकतीचे वर्णन**
**मौजे शिरढोण, तहसिल पनवेल, जिल्हा रायगड येथील**

| भूमापन क्र. | उपविभाग | क्षेत्र लावणी लायक हे.आर.चौ.मी. | क्षेत्र पोट खराबा हे.आर.चौ.मी. | क्षेत्र एकूण हे.आर.चौ.मी. | आकारणी रु. पै. |
|---|---|---|---|---|---|
| ३३२ | ४/ब | ४-४७-०० | ०-६९-०० | ५-१६-०० | १५.२८ |

वरील वर्णनाच्या शेतजमीनीचे संदर्भात अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, ट्रस्ट, पोटगी, वारसा, भाडेपट्टा वहीवाट वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहीत सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोष्टाने पाठवाव्यात.

वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर जमीन निर्वेध व बोजारहीत आहे असे समजणेत येवून सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालकाबरोबर पुर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशीलावर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : /०८/२०२५

**ॲड. अतुल तुकाराम भोपी**
कार्यालय:-बी/८,माणेक नगर को-ऑप.हौ.सोसायटी,
महाराणा प्रताप रोड, परदेशी आळी, पनवेल,
ता.पनवेल, जि.रायगड, ४१०२०६.
मो.नं. ९३२४६७९५०७


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## अलिबाग नगर परिषद ता.अलिबाग जि.रायगड

**जाहिर निविदा सन २०२५-२६**

अलिबाग नगर परिषद जिल्हा रायगड करीता मुख्याधिकारी अलिबाग नगर परिषद यांचे बांधकाम विभागा कडुन अलिबाग नगर परिषद हद्दीतील किल्लेपाडा येथील बापदेव मंदिर ते मच्छिमार्केट पर्यंत आर.सी.सी.गटार बांधकाम करणे कामाकरीता सक्षम बचत गटांकडून लिफाफा पद्धतीने जाहीर निविदा मागविणेत येत आहेत.

टिप:-वरील निविदेशी संबंधीत अधिकृत माहिती व निविदा फॉर्म साठी नगरपरिषद कार्यालयातील बांधकाम विभागात कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस वगळता) संपर्क साधावा.

दिनांक : २८/०८/२०२५ स्वा/-
**मुख्याधिकारी**
**अलिबाग नगरपरिषद जि.रायगड**

आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,**
**रायगड-अलिबाग यांचे कार्यालय कॉंग्रेस भुवन ट्रस्ट,**
**तळमजला, महर्षी कर्वे, अलिबाग जि. रायगड**
दूरध्वनी क्रमांक ०२१४१-२२२०१३ ई-मेल .ddr_rgd@rediffmail.com

जा.क्र. जिउनि/गृह/मोफा/नियो./जाहीर नोटीस /१९९०/ सन २०२५ दिनांक :-२६/०८/२०२५

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम १० (१) अन्वये प्राप्त अर्जावरील नोटीस**

अर्जदार नियो. तानाजी मालुसरे सिटी पुष्पक सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. शिरसे, ता. कर्जत, जि. रायगड तर्फे मुख्यप्रवर्तक श्री नंदकिशोर लक्ष्मण कोळी, ता. कर्जत, जि. रायगड यांनी शेलट्रेक्स कर्जत प्राईवेट लिमि. पूर्वीचे नाव गोपी रिसोर्ट प्राईवेट लिमि. तर्फे डायरेक्टर सुरेश सिंह तर्फे कु मु धारक जयेश तुकाराम पाटील रा. शिरसे आकुर्ले, ता. कर्जत, जि. रायगड यांचेविरुध्द महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (मोफा) अधिनियमाचे कलम १० (१) अन्वये संस्था नोंदणीचे निर्देश मिळणेकरीता अर्ज केला आहे.

अर्जदाराचे अर्जाबाबत सर्व संबंधीताना आपले म्हणणे सादर करणेसाठी संधी मिळावी म्हणून या कार्यालयाने सुनावणी घेतली आहे. त्यामध्ये सदर अर्जाबाबत गैरअर्जदार यांना नोटीस पाठविण्यांत येवून सदरची नोटीस त्यांना प्राप्त झालेली आहे. तरीही प्रतिवादी यांचेवतीने किंवा ते स्वतः सुनावणीस उपस्थित राहीले नाहीत. सबब अर्जदाराने जाहीर पेपर नोटीस मागणी केली आहे. गैरअर्जदाराचे म्हणणे दाखल करणेसाठी अंतीम संधी देण्यांत येत असून त्यांनी प्रस्तावीत कार्यवाहीबाबत त्यांचे म्हणणे दिनांक ११/०९/२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता उपस्थित राहून मांडावे. तसेच निश्चित दिवशी व वेळी सुनावणीस आवश्यक त्या कागदपत्रांसह हजर रहावे. यात कसूर झाल्यास त्यांची काहीही हरकत नाही असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक २६.०८.२०२५

सही/-
**(प्र.का.जगताप)**
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक**
**सहकारी संस्था, रायगड अलिबाग**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मिळकत त्याचे मालक श्री.साहेबराव सुखदेव खिल्लारी यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन:-**
**मौजे - चई, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे-आर-पॉ | आकार रु-पै |
|---|---|---|---|
| १६ | ३ | ०-८७-००<br>पो.ख. ०-२९-००<br>एकुण १-१६-०० | ०-४७ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमांचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

मोबाईल:-
०९३२६२३६९२३
०९६८९६९९५९५

**ॲड. प्रवीण शांताराम खडे**
पत्ता: -२,''लक्ष्मी सदन'', जुने एस. टी. स्टॅण्ड,
मु.पो. नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड.

## राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टिलायझर्स लिमिटेड

भारत सरकारचा उपक्रम)
प्रशासकीय इमारत, चेंबूर, मुंबई - 400074
CIN-L24110MH1978GOI020185
(नवरत्न कंपनी)

**जाहिरात क्र.: 29082025**

### ट्रॉम्बे युनिट मध्ये ॲक्ट ॲप्रेंटिसची भरती

मुंबई ट्रॉम्बे व थळ युनिट मध्ये ॲक्ट ॲप्रेंटिस अधिनियम, १९६१ च्या अंतर्गत ट्रेड ॲप्रेंटिसची भरती करण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टिलायझर्स लिमिटेड, भारत सरकारचा उपक्रम आहे, जी खते व रसायनांचे उत्पादन करणारी नवरत्न कंपनी आहे. आरसीएफ लिमिटेड ची उत्पादन करणारी दोन युनिट्स आहेत, जी ट्रॉम्बे, मुंबई येथे व दुसरे थळ, रायगड येथे आहेत.

ट्रॉम्बे व थळ युनिट मध्ये प्रशिक्षणासाठी इच्छुक असणारे उमेदवार कंपनीच्या www.rcfltd.com संकेत स्थळावर एच.आर. सेक्शनच्या अंतर्गत Recruitment सेक्शन मध्ये ऑनलाइन अर्ज करू शकतात.

इच्छुक उमेदवार ऑनलाइन अर्ज दिनांक 29.08.2025 पासून 12.09.2025 पर्यंत करू शकतात.

**कार्यकारी संचालक (मानव संपदा)**

साथ बढ़ें समृद्धि की ओर

## मुरुड जंजिरा नगरपरिषद, जि.रायगड

**ई - निविदा सुचना सन २०२५-२६**
**म्यु.जा.क्र.९४०/ई-निविदा/मु.न.प. २०२५-२०२६**

मा.प्रशासक तथा मुख्याधिकारी, मुरुड जंजिरा नगरपरिषद, जि.रायगड यांचेकडून १.मुरुड जंजिरा नगरपरिषद करिता कोटेश्वरी मंदिर ते समुद्रकिनारा या दरम्यान नाल्यावर रस्ता बांधकाम करणे. या कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे. या कामासंबंधीचा सविस्तर तपशिल व अटी-शर्ती : http://mahatenders.gov.in व या वेबसाईटवर दिनांक २८/०८/२०२५ पासून उपलब्ध असून निविदा भरण्याचा अंतिम दिनांक. ०८/०९/२०२५ आहे.

दिनांक :- २६/०८/२०२५

सही/-
**प्रशासक तथा मुख्याधिकारी**
**मुरूड जंजिरा नगरपरिषद**

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मिळकत, खालील मालकाकडून कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरवले आहे. तशी जमिन मालकांबरोबर बोलणी झालेली आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नंबर | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) | मालकाचे नांव |
|---|---|---|---|---|
| झिराडपाडा, ता.अलिबाग, जि.रायगड | १८६ | ०-१२-००<br>०-०१-००<br>एकुण ०-१३-०० | ०.२० | कनवर्जित सिंघ |

मौजे झिराड, ता.अलिबाग, जि. रायगड येथील गट नं.४०९ मधील ०-०१-३२ हे.आर. इतक्या क्षेत्राच्या वहिवाटीसहीत.

सदर मिळकतीवर कुणाचाही गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, पोटगी, चार्ज, बक्षिस, वहिवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, कुळ हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे कागदपत्रे पुराव्यासहीत लेखी कळवावे. तशी कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, मुदतीत आमच्याकडे न आल्यास वरील मिळकतीवर कुणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अगर अथवा तो असल्यास तो आमचे अशिलांचे लाभांत सोडून दिलेला आहे व सदर मिळकत ही निर्वेध, बोजारहित आहेत असे गृहित धरून सदरहू मिळकतीसंबंधी आमचे अशिल खरेदी विक्रीचा व्यवहार करतील. मुदतीचे बाहेर आलेल्या कुणाच्याही, कोणत्याही प्रकारच्या हरकती/तक्रारी विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

अलिबाग.
दिनांक :२६/०८/२०२५.

**ॲड. सुनिल के.वाकडे**
डी-१, तळमजला,
हिराबाग को.ऑप.हौ.सोसायटी,
सगुण हॉटेल शेजारी, अलिबाग,
ता.अलिबाग, जि.रायगड
मोबा.नं.९८६७७१५५२४

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहीर नोटीस

**अर्ज क्र.२१६/२०२५**

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्रीम. रशीदा महमद वसगरे
लग्नापूर्वीचे नाव
श्रीम.रशीदा अय्युब काझी
लग्नानंतरचे नाव — अर्जदार
वय ७१ वर्षे, धंदा : गृहिणी,
रा.मु.पो.मोर्बा
ता.माणगांव, जि.रायगड,

विरुद्ध

१. निबंधक जन्म- मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत लोणशी
ता.माणगांव, जि.रायगड. — सामनेवाला
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता.माणगांव, जि.रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्रीम. रशीदा महमद वसगरे लग्नापूर्वीचे नाव व श्रीम. रशीदा अय्युब काझी- लग्नानंतरचे नाव हिचा जन्म मौजे लोणशी, ता.माणगांव, जि. रायगड येथे दि.०१/०६/१९५४ रोजी राहत्या घरी झाला. त्यांची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दि.२०/०९/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचा जन्म मौजे लोणशी, ता.माणगांव, जि.रायगड येथे दि.०१/०६/१९५४ रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्रीम. रशीदा महमद वसगरे-लग्नापूर्वीचे नाव व श्रीम.रशीदा अय्युब काझी-लग्नानंतरचे नाव हिचा जन्म मौजे लोणशी, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. ०१/०६/१९५४ रोजी राहत्या घरी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

ठिकाण :- माणगांव
ता. २६/०८/२०२५

सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे चई, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक १) श्री.दत्तात्रेय यशवंत हुमणे २) श्री.जयराम यशवंत हुमणे ३) श्रीम.काळुबाई विठ्ठल हुमणे ४) श्री.उत्तम विठ्ठल हुमणे ५) श्री.निलेश विठ्ठल हुमणे ६) श्री.रुपेश विठ्ठल हुमणे यांजकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे :-

| सर्व्हे नं./हिस्सा नं. | क्षेत्रफळ (हे.आर) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|
| २८/२/४/ई/४/क/२ | ६-५७-००<br>पैकी ०-८०-०० | २=६३ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, ताबा कब्जा, कुळवहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, ॲटॅचमेंट, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : २८/०८/२०२५

**ॲड. महेश मोतीराम घारे**
मु.सांगवी, ता.कर्जत, जि.रायगड
मो. ९८८१८५८६५४
९२७१८६९२०२

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसने असे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली शेतजमिन मिळकत तिचे मालक श्री.हनुमंत गजानन दुर्गे, रा.सांगवी, ता.कर्जत, जि.रायगड यांचेकडुन कायमची खरेदी करणेचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे मुळगाव तर्फे वासरे, ता.कर्जत, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| ६४ | ३ | ०.३५.४० | ०.७८ |
| ७१ | ३ | ०.६१.२० | ६.०० |

सदर मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पुर्ण केला जाईल मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

दि. २९/८/२०२५

**ॲड. कैलास गणपत मोरे**
बी.एल.एस, एल.एल.बी
प्रभात अपार्टमेंट, रूम नं.४, दुसरा मजला,
सुनिल चिक्कीजवळ, ता.कर्जत, जि.रायगड
मो.नं.९९६०८३८१६४/९०२८५०८४९६

## जाहीर नोटीस

सर्वांना या नोटीसने असे कळविणेत येत आहे की, जिल्हा रायगड, तालुका अलिबाग पैकी गांव वैजाली येथील नगर भूमापन क्रमांक ४३३ मधील मंजुळा कृष्णा डाकी यांचे मालकीचे १२७.९५ चौ. मी. इतके क्षेत्र व प्रतिभा रोहिदास पाटील यांचे मालकीचे १२७.९५ चौ. मी. इतके क्षेत्र असे एकूण क्षेत्र २५५.९० चौ.मी. व त्यावर असणारे ग्रामपंचायत वैजाली हाशिवरे यांचेकडील मालमत्ता क्रमांक २६१ हे घर मंजुळा कृष्णा डाकी यांचे मालकीचे असून, सदर जमिन मिळकतीसह घर मंजुळा कृष्णा डाकी व प्रतिभा रोहिदास पाटील यांचेकडून आमचे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर व्यवहार पूर्ण करणेपूर्वी सदर मिळकतीमध्ये त्रयस्थ व्यक्तीची काही जडजोखीम असल्यास त्याची माहिती मिळविण्याकरिता ही नोटीस देण्यांत येत आहे.

तरी, सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत नोंदवावी, सदर मुदतींत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

तारीख : २९/०८/२०२५

सही/-
**ॲड. संजीव अनिल घरत,**
ऑफीस पत्ता : मु. पो. खंडाळे,
तालुका अलिबाग, जिल्हा रायगड ४०२२०९

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसने असे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली शेतजमिन मिळकत तिचे मालक श्री. सुधाकर परशुराम घारे, रा.सांगवी, ता.कर्जत, जि.रायगड यांचेकडुन कायमची खरेदी करणेचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे मुळगाव तर्फे वासरे, ता.कर्जत, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| ६० | ३ अ | ०.३१.२० | ३.८३ |
| ६४ | २ | ०.२६.३० | १.१९ |
| ६४ | ५ | ०.१०.४० | १.१९ |
| ६४ | ७ | ०.२७.६० | २.७२ |
| ६४ | ८ | ०.३३.४० | २.६६ |
| ६५ | ० | ०.१३.०० | ०.१२ |
| ६६ | २ | ०.६०.४०<br>पैकी १८ गुंठे | ६.३७ |
| ७० | १ | ०.३१.०० | ०.३१ |

सदर मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पुर्ण केला जाईल मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

दि. २९/८/२०२५

**ॲड. कैलास गणपत मोरे**
बी.एल.एस, एल.एल.बी
प्रभात अपार्टमेंट, रूम नं.४, दुसरा मजला,
सुनिल चिक्कीजवळ, ता.कर्जत, जि.रायगड
मो.नं.९९६०८३८१६४/९०२८५०८४९६

## अपर जिल्हाधिकारी रायगड मुख्यालय अलिबाग यांचे न्यायालयात

**जिल्हाधिकारी कार्यालय आवार, अलिबाग जि.रायगड**

क्रमांक/हक्कनोंद/अपील क्र.२७५/२०२५

१ श्री.रमेश कमळाकर माळी
रा.मु.पो.मजगांव, ता.मुरुड, जि.रायगड — अपिलार्थी

विरुद्ध

१ श्री. शफी हसन तांडेल
रा.मु.पो नांदगाव, ता.मुरुड, जि.रायगड
२ श्री.रामकृष्ण हरिश्चंद्र माळी — - उत्तरार्थी
रा.संत निरंकारी,भवन, हरी ओम चाल, वालीव,
वसई-४०१२०१

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये**

या जाहिर नोटीसीद्वारे आपणास कळविण्यात येते की, मौजे मजगांव, ता. मुरुड, जि.रायगड येथील सर्व्हे नं./गट नं.२१२ क्षेत्र ०-५५-०० हे.आर. आकार ०.४० या जमीन मिळकती संदर्भात अपिलार्थी यांनी उपविभागीय अधिकारी अलिबाग यांचेकडील आरटीएस अपील क्र.४७/२०२४, दि. २८/०३/२०२५ मधील आदेशाविरुद्ध या न्यायालयाकडे अपील दाखल केलेले आहे सदर अपीलाची नोटीस काढली असता त्याची बजावणी होऊ शकली नाही. आपला राहण्याचा शेवटचा पत्ता वरीलप्रमाणे असल्याची माहिती अपिलार्थी यांस आहे. सबब, अपिलार्थी या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, सदर प्रकरणामध्ये दि.०१/०९/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता अपर जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांचे कार्यालयात सुनावणी निश्चित करणेत आलेली आहे. तरी आपण स्वतः अगर तुमचे वकीलांमार्फत सदर सुनावणीस हजर रहावे. आपण हजर न राहिल्यास आपले गैरहजेरीत प्रकरणामध्ये सुनावणी होऊन, आदेश दिला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २६/०८/२०२५

सही/-
**अपर जिल्हाधिकारी रायगड**
**अलिबाग करीता**

## पेपर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येत आहे की खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांची विद्यमान मालक श्री. रघुनाथ हरलिंग जंगम यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याबाबतचा व्यवहार आमचे अशिलांनी ठरविला आहे व या व्यवहाराची जाहीर नोटीस वर्तमानपत्र देण्याबाबत विद्यमान मालक श्री.रघुनाथ हरलिंग जंगम यांनी आमच्या अशिलांना लेखि पत्राद्वारे मान्यता दिलेली आहे व आमचे अशिलांच्या सांगण्यावरून ही वर्तमानपत्रात जाहीर नोटिस मी देत आहे.

**मिळकतीचे वर्णन :** मौजे गोमाशी ( ५५४५४१): PU ID: 24893093963,ता.सुधागड जि.रायगड

| गट क्रमांक | भुधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ५९०<br>खाते क्रमांक-६५६ | २ | १-१८-००<br>पो.ख ०-१६-००<br>एकूण क्षेत्र १-३४-०० | ०-२५ |

या एकूण क्षेत्रापैकी विक्रेते यांच्या हिश्याचे १-३४-०० गुंठे

वर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही तिरहित व्यक्तीचा अथवा व्यक्तीच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षीस खरेदीखत साठेकरार मिळकत विकसित करणे बाबतचा करार कुळ हक्क, वारसा, वहीवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्युपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती किंवा त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदपत्रे पत्रात पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावे अन्यथा दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाही व सदर मिळकत निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदी करण्याचा व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून १४ दिवसांच्या मुदती नंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्या हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : २९ ऑगस्ट २०२५.

सही /-
**ॲड. निलेश झंजाड**
बी-१०४ सफायर सी.एच.एस.लि.
सेक्टर २२ भूखंड क्रमांक ३३/३४
कामोठे-ता.पनवेल, जि.रायगड
बि.सं.क्र.९९२०४७५८०१

जा.क्र.नोंदणी शाखा/ १९२९/२५
सहाय्यक धर्मादाय आयुक्त
रायगड विभाग अलिबाग यांचे कार्यालय
कल्पतरु इमारत, पोस्ट ऑफिसजवळ,
अलिबाग, जि. रायगड

**चौकशीची जाहीर नोटीस**
**नियम ७ अ प्रमाणे**

अर्ज क्रमांक :- ३७६/२०२५ दि. २२/०८/२०२५

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक:-''ग्रेस फेलोशिप ट्रस्ट'', पनवेल,
..बाबत.
श्रीमती. शिरीन पाटोले .. अर्जदार

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की,

सहायक धर्मादाय आयुक्त रायगड विभाग रायगड हे वर नमूद केलेला नोंदणी अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत:-

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

(अ) जंगम मिळकत :- (वर्णन) रोख रक्कम ५०००/- रुपये

(ब) स्थावर मिळकत : (वर्णन) काही नाही

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावाची असेल अगर त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकाल बाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहिनिशी व मी सहायक धर्मादाय आयुक्त रायगड अलिबाग यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक २२.०८.२०२५ रोजी दिली.

सही/-
**अधिक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**रायगड विभाग, रायगड**

